नोव्हेंबर २०२४

# या नंतरचे दलाई लामा : पुढच्या अवताराची तयारी आणि भारतासाठी त्याचे असलेले महत्त्व

विजय गोखले

# या नंतरचे दलाई लामा : पुढच्या अवताराची तयारी आणि भारतासाठी त्याचे असलेले महत्त्व

विजय गोखले

अनुवादिका : पूनम छत्रे

© 2024 Carnegie Endowment for International Peace. All rights reserved.

Carnegie does not take institutional positions on public policy issues; the views represented herein are those of the author(s) and do not necessarily reflect the views of Carnegie, its staff, or its trustees.

No part of this publication may be reproduced or transmitted in any form or by any means without permission in writing from Carnegie India or the Carnegie Endowment for International Peace. Please direct inquiries to:

Carnegie Endowment for International Peace
Publications Department
1779 Massachusetts Avenue NW
Washington, D.C. 20036
P: + 1 202 483 7600
F: + 1 202 483 1840
CarnegieEndowment.org

Carnegie India
Unit C-4, C-5 & C-6, Edenpark,
Shaheed Jeet Singh Marg
New Delhi – 110016, India
P: +011 4008687
CarnegieIndia.org

This publication can be downloaded at no cost at CarnegieIndia.org

## Contents


| | |
|---|---|
| विषय प्रवेश | 1 |
| भाग १ : चीन आणि चायनीज कम्युनिस्ट पार्टीमध्ये धर्माचे स्थान | 3 |
| भाग २ : अमेरिका, चीन आणि तिबेटी बौद्ध धर्म | 8 |
| भाग ३ : दलाई लामांबाबत भारत आणि चीन यांचे थोडक्यात दृष्टीकोन | 12 |
| भाग ४ : उपलब्ध पर्याय | 16 |
| तात्पर्य | 19 |
| लेखाविषयी | 21 |
| टिपा | 25 |
| Carnegie India | 31 |

# विषय प्रवेश

१४वे परमपूज्य दलाई लामा एकोणनव्वद वर्षांचे आहेत. १९५९ पासून ते निर्वासित म्हणून रहात आहेत. ते ११३ वर्षांचे होईपर्यंत जगतील, अशी हमी त्यांनी त्यांच्या अनुयायांना दिलेली आहे. [१] १९८०च्या दशकाच्या सुरुवातीपासून दलाई लामांनी पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना (पीआरसी) बरोबर समेट करायचे अनेक प्रयत्न केले. अजूनपर्यंत, त्यांना फळ आलेले नाही. भविष्यात जर समेट झाला, तर त्यांना तिबेटमध्ये परत जाता येईल, ही शक्यता असली, तरी तसे होण्याची शक्यता धूसर आहे. कदाचित निर्वासित म्हणूनच त्यांचे निधनही होऊ शकते. २०२२ मध्ये त्यांनी असे विधान केले होते, की चिनी अधिकाऱ्यांच्या वेढ्यात मृत्यू येण्यापेक्षा भारतासारख्या मुक्त आणि लोकशाही असलेल्या देशात त्यांना मृत्यू यावा, अशी त्यांची इच्छा आहे.[२]

बुद्धाचा अवतार असल्यामुळे, त्यांचा पुनर्जन्म होईल. पण त्यांचा उत्तराधिकारी कोण असेल या बाबतीत अनिश्चितता आहे, कारण हे अवतारकार्य त्यांच्याबरोबरच संपेल, अशी शक्यता सद्य दलाई लामांनी वर्तवली आहे. ते तिबेटच्या बाहेर पुनर्जन्म घेतील, असेही संकेत त्यांनी अनेकदा दिले आहेत. १९५० पासून तिबेटवर सत्ता असलेल्या पीआरसीचे असे म्हणणे आहे, की १४व्या दलाई लामांचा जो वारस असेल, त्याचा जन्म चीनमध्येच झालेला असेल आणि चिनी सरकारच्या पसंतीची मोहोर त्याच्यावर असेल.

दलाई लामांचा पुढचा अवतार कोण असेल, हे कोण ठरवते, हा विवादास्पद मुद्दा आहे. दलाई लामा (आणि तिबेटमध्ये असलेले इतर बुद्धावतार) निवडण्याच्या प्रक्रियेवर चीनला कायदेशीर हक्क आणि अधिकार नाही, असे म्हणत तिबेटी जनतेने चीनचे मनसुबे नाकारले आहेत. पीआरसीचा असा दावा आहे, की १७९३ साली काढलेल्या शाही अध्यादेशात (याला तिबेटच्या उत्तम शासनासाठी काढलेला शाही मान्यतेचा अध्यादेश किंवा २९-आर्टिकल अध्यादेश असे म्हणतात) दलाई लामांसहित सर्व बुद्धावतारांच्या पुनर्जन्माची प्रक्रिया निर्धारित केलेली आहे आणि निवडलेल्या उमेदवारावर अंतिम पसंती बीजिंगकडून येईल असे लिहिलेले आहे.[३] पण, हेही वास्तव नाकारता येत नाही, की १७९३च्या शाही अध्यादेशानुसार दलाई लामांच्या निवडीची जी निर्धारित सुवर्ण कलश

पद्धत आहे, ती फक्त ११वे आणि १२वे दलाई लामा निवडताना वापरली गेली होती. ९वे, १३वे आणि १४वे दलाई लामा निवडताना ती पद्धत वापरण्यात आलेली नव्हती.[४]

जर सद्य दलाई लामांनी पीआरसीच्या हद्दीबाहेर पुनर्जन्म घेतला आणि पीआरसीने त्याचा स्वतंत्र दलाई लामा निवडला, तर एकाच वेळी एकापेक्षा अधिक १५वे दलाई लामा अस्तित्वात असतील, अशीही शक्यता आहे.[५]

१९५९ पासून दलाई लामांनी भारतात आश्रय घेतल्यामुळे भारतातून या स्थितीकडे बारकाईने लक्ष दिले जाईल. भारत आणि पीआरसी यांच्या संबंधांमध्ये त्यांच्या या आश्रयाचा अडथळा नेहेमीच येतो. त्यांचे निधन झाल्यावर भारतीय भूमीत अनेक निर्वासित तिबेटी नागरिक राहतीलच. त्यांनी पुढचा अवतार भारतातच शोधला, किंवा इतरत्र शोधून त्याला भारतात आणले गेले, तर चीनबरोबरचे संबंध अधिक गुंतागुंतीचे होतील. कारण, स्वायत्त चिनी भूमीतच आणि चीनच्या स्वीकृतीनेच अवतार शोधला गेला पाहिजे, असे चीनने घोषित केलेले आहे. एका अभ्यासानुसार, पीआरसी कदाचित सेंट्रल तिबेटन ऍडमिनिस्ट्रेशन (सीटीए) आणि भारतात स्थित असलेल्या तिबेटी शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्था बंद कराव्यात अशी मागणी करू शकेल. भारताच्या हिमालयी क्षेत्रात अनेक बौद्ध मठ आणि समाज आहेत. चीन या मठांमध्ये घुसखोरी करून, तिबेटी निर्वासितांवर प्रभाव टाकून त्यांच्यात फूट पाडेल, अशी शक्यताही वर्तवण्यात आलेली आहे. त्यामुळे भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने त्याच्या परिणामांचा विचार करावा लागेल.[६]

पुढच्या अवताराचा हा पेच भारताच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. तिबेटी बौद्ध धर्माचे अनुयायी मोठ्या प्रमाणावर भारताच्या हिमालयी राज्यांमध्ये आहेत. त्यामुळे, पुढच्या दलाई लामांच्या निवडीत विवाद निर्माण झाला, तर स्थानिक पातळीवर त्याचे परिणाम होतील. पीआरसीने तिबेटच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यामुळे भारतात मोठ्या प्रमाणावर तिबेटी नागरिक राहतात. त्यामुळे तिबेटच्या सर्वोच्च अध्यात्मिक प्रमुखपदाचे हस्तांतरण सुरळीत व्हावे हीच भारताची इच्छा आहे. त्यामुळे, असा पेच निर्माण झालाच, तर भारताचे धोरण फार महत्त्वाचे असेल, कारण भारतासाठी हा मुद्दा अंतर्गतपणे संवेदनशील तर आहेच, पण भारत आणि पीआरसी यांमधले भविष्यातले संबंधदेखील या मुद्द्यावर अवलंबून असतील.

भारतात दलाई लामांच्या पुनर्जन्माच्या मुद्द्याकडे सहसा द्वीपक्षीय दृष्टीकोनातून पाहिले जाते – एक तर त्याचा वापर भारत करून घेऊ शकतो किंवा त्याचा वापर करून चीन-भारत संबंधावर चीन दडपण टाकायचा प्रयत्न करतो. चीनने असे गृहित धरले आहे, की १४व्या दलाई लामांनंतरच्या काळात पीआरसीकडून जे धोरण आखले जाईल त्यात भारताकडून पुनर्जन्माचा मुद्दा संवेदनशील ठरवला जाईल. त्यामुळे पीआरसीची भूमिका सुप्त किंवा प्रतिक्रियावादी आहे. दलाई लामा आणि तिबेट या मुद्द्यांच्या पलीकडे जाऊन भारत-चीनच्या बदलत्या संबंधांवर दृष्टीक्षेप टाकायचा या लेखाचा प्रयत्न आहे. पुनर्जन्माच्या मुद्द्याव्यतिरिक्त चीन त्याचे व्यापक अंतर्गत आणि विदेश धोरण कोणत्या प्रकारे ठरवतो, हे महत्त्वाचे आहे. त्यानुसार मग भारत योग्य असे धोरण ठरवेल.

या लेखाची विभागणी चार भागांमध्ये केलेली आहे. धर्म आणि त्यातही तिबेटी बौद्ध धर्म आणि पुढच्या दलाई लामांची निवड यांप्रती चीनचा दृष्टीकोन १९४९ पासून कसा विकसित होऊन बदलत गेला याचा ऊहापोह पहिल्या भागात केला आहे. दुसरा भाग बाह्य घटकांबद्दल आहे. अमेरिकेचा तिबेटी बौद्ध धर्म आणि दलाई लामा यांच्याप्रती असलेल्या दृष्टीकोनाचा प्रभाव चीनच्या तिबेट धोरणावर कसा पडला आणि सध्या असलेल्या अमेरिका-चीन संबंधांचा परिणाम चीनच्या पुनर्जन्म धोरणावर पडेल असा अंदाज त्या भागात व्यक्त केलेला आहे. या दोन्ही भागातून सद्य मुद्द्यावर

चीनचे धोरण कोणत्या अंतर्गत आणि बाह्य घटकांमुळे घडेल यावर विवेचन केलेले आहे. दलाई लामांच्या मुद्द्यातून भारत-चीन संबंधांच्या इतिहासाचा धांडोळा आणि दोन्ही देशांनी हा मुद्दा कसा हाताळला आहे यावर तिसऱ्या भागात भाष्य केलेले आहे. दलाई लामा भारतात आल्यानंतर मागच्या पासष्ठ वर्षांत दोन्ही देशांमध्ये जो संवाद झाला त्यावर आधारित काही निष्कर्ष शोधण्याचा प्रयत्न या भागात केलेला आहे. १४व्या दलाई लामांच्या पश्चात भारताला एक सुसंगत आणि ठाम धोरण तयार करायचे असेल, तर भारताला कोणत्या धोरणात्मक प्रश्नांवर आधी तोडगा काढावा लागेल, यावर चौथ्या भागात भाष्य केलेले आहे.

या लेखाचा असा निष्कर्ष आहे, की पीआरसीचे दलाई लामांबद्दल असलेले धोरण आणि पुनर्जन्माचा पेच हे भारताने केलेल्या कोणत्याही कृती वा धोरणांवर आधारित नव्हते. मोठ्या प्रमाणावर वांशिक फरक असलेल्या सीमा प्रदेशात राजकीय-सामाजिक स्थैर्य प्रस्थापित करण्याची अंतर्गत गरज आणि अमेरिका-चीन स्पर्धेतले सतत बदलणारे घटक हे या धोरणातले प्रमुख घटक आहेत. जोपर्यंत सामाजिक स्थैर्य आणि चीन-अमेरिका स्पर्धेला धक्का लागत नाही, तोवर दलाई लामांनी भारतात आश्रय घेण्याबद्दल चीनला आक्षेप नाही. १४व्या दलाई लामांच्या निधनानंतर भारत कदाचित स्वत:हून जी कृती करेल (उदा. दलाई लामांनी निवडलेल्या वारसदाराला भारतात राहण्याची परवानगी न देणे किंवा पीआरसीने १४व्या दलाई लामांच्या निवडलेल्या वारसाला औपचारिक मान्यता देणे), त्याने पीआरसीचे भारताप्रती असलेल्या धोरणात काहीही बदल होणार नाही. १४व्या दलाई लामांच्या निधनानंतर भारत-चीन-तिबेट समीकरणातही मोठा बदल होईल, कारण पुढच्या अवताराबद्दल त्यांच्यात एकवाक्यता असेलच, असे नाही. यातून फार महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतील, ज्याची धोरणात्मक उत्तरे भारताला आधीपासूनच तयार ठेवावी लागतील. त्यांचे वय आणि तब्येत बघता, या महत्त्वाच्या प्रश्नांवर गांभीर्याने विचार करणे लांबणीवर टाकणे योग्य होणार नाही.

# भाग १ : चीन आणि चायनीज कम्युनिस्ट पार्टीमध्ये धर्माचे स्थान

१९४९ पूर्वी माओ झेडाँगच्या संवाद आणि भाषणांमध्ये धर्माला फार मोठे स्थान नव्हते. तिबेटसह अल्पसंख्यांक प्रदेशांमध्ये चीनमध्ये कम्युनिस्ट राजवट स्थापन करणे हे त्याचे प्राधान्य होते.[७] माओच्याच शब्दांत, चीनचा जवळपास निम्म्या प्रदेशात अल्पसंख्याक प्रदेश होते, त्यांमध्ये साधन संपत्ती भरपूर होती आणि ते सर्व सीमाप्रदेश होते.[८] त्यामुळे, तिबेटवर चीनचे नियंत्रण असणे याला सर्वाधिक प्राधान्य होते, तो धार्मिक प्रश्न नव्हता.

धर्माबाबत धोरणाचा सर्वसामान्य विचार करता, धर्म आणि कम्युनिझम हे संपूर्णपणे विरुद्ध विषय होते, त्यामुळे नव्याने स्थापन झालेल्या पीआरसीने धर्माबद्दल सौम्य दृष्टीकोन अंगीकारला. त्यांना लोकसंख्येच्या सर्व स्तरांमधून पाठिंब्याची गरज होती आणि चीनच्या समाजावर धर्माचा प्रभाव आहे, हे वास्तव त्यांनी मान्य केले. एप्रिल, १९४५ मध्ये माओ झेडाँगने चायनीज कम्युनिस्ट पार्टी (सीसीपी)च्या सातव्या राष्ट्रीय अधिवेशनात सांगितले, “चीनच्या स्वतंत्र प्रदेशांमध्ये धार्मिक स्वातंत्र्याच्या तत्त्वानुसार सर्व धर्मांना परवानगी आहे. प्रोटेस्टंट, कॅथॉलिक, इस्लाम, बौद्ध आणि

इतर धर्मांना सरकार सुरक्षा देईल, पण त्यांनीही कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे."[९] धार्मिक गटांसाठी सीसीपीने आखलेल्या धोरणात दोनच मुद्दे प्राधान्याने होते – सामाजिक स्थैर्य आणि राष्ट्रीय सुरक्षा. सामाजिक स्थैर्याबद्दल पार्टीचे असे मत होते, की समाजावर संपूर्ण नियंत्रण मिळवण्याच्या सीसीपीच्या प्रयत्नांच्या आड लोप पावलेली सरंजामशाही आणि धार्मिक गट यांची हातमिळवणी येईल. राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर, चीनमध्ये विदेशी धार्मिक संस्थांचे वर्चस्व वाढले, तर ती विरोधाची केंद्र होतील अशी त्यांना चिंता होती. अशा बाबतीत, पार्टीने कडक धोरण आखले आणि धार्मिक गटांविरुद्ध कारवाई केली.

राजकीय नियंत्रण मिळवणे हे सीसीपीच्या दृष्टीने प्राधान्याचे असल्यामुळे, १९४९ साली पीआरसीची स्थापना झाल्याबरोब्बर तिबेटवर आक्रमण करण्याची योजना करण्यात आलेली होती.[१०] माओने स्वत: या योजनेला मान्यता दिलेली होती.[११] ऑक्टोबर, १९५० मध्ये पीपल्स लिबरेशन आर्मीने आक्रमण केल्यानंतर तिबेट सरकारला केंद्रीय आणि स्थानिक सरकारी पातळीवरून करार करणे भाग पाडले गेले. त्या कराराला मेझर्स फॉर पीसफुल लिबरेशन ऑफ तिबेट (सतरा मुद्द्यांचा करार) असे म्हणतात. त्यानंतर तिबेट चीनच्या "मातृभूमीच्या विशाल कुटुंबात" सामील झाला. तिबेटला केवळ "स्थानिक सरकार" असे स्वायत्त स्थान मिळाले, केंद्रीय नियंत्रण आणि प्रमुखपद बीजिंगकडेच राहिले. [१२]

सीसीपीचा दलाई लामा आणि तिबेटी बौद्ध धर्मगुरूंवर विश्वास नव्हता. पण त्यांचा प्रभाव तिबेटवर फार नव्हता आणि तिबेटवर संपूर्ण नियंत्रण मिळवण्याइतके बळही त्यांच्याकडे नव्हते, याची कल्पना पार्टीला होती. दलाई लामांबरोबर बोलणी करण्याआधी पार्टीचे संघटन करणे आवश्यक होते. एप्रिल, १९५२ मध्ये पार्टीच्या केंद्रीय समितीने तिबेटची जबाबदारी असलेल्या कार्यालयाला एक अंतर्गत आदेश पाठवला, ज्यात असे मान्य केले होते, की "त्यांची (दलाई लामांचे सरकार) लष्करी ताकद आपल्यापेक्षा अतिशय कमी असली, तरी त्यांचा समाजावर मोठा प्रभाव आहे आणि त्याचा त्यांना फायदा होईल. कराराची संपूर्ण अंमलबजावणी करणे आपण आत्ता पुढे ढकलू." त्यापेक्षा, "तिबेटची आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेचे हळूहळू आणि शांततापूर्ण हस्तांतरण काही वर्षांच्या कालावधीत साध्य करण्यासाठी दलाई लामा आणि त्यांच्या सर्वोच्च नेत्यांचे मन जिंकणे" याला प्राधान्य होते.[१३] तिबेटी बौद्ध धर्मात थेट ढवळाढवळ केली गेली नाही, पण इतर मार्गांनी दलाई लामांचे महत्त्व कमी करण्याचे प्रयत्न सुरू झाले.[१४] १९५०च्या सुरुवातीला पीआरसीने घेतलेल्या धीम्या दृष्टीकोनाचे प्रतिबिंब दलाई लामांच्या एका विधानात पडले आहे. 'ज्याच्याबरोबर त्यांचे चांगले संबंध आहेत, अशी आदरणीय आणि ज्येष्ठ व्यक्ती', असा माओचा उल्लेख त्यांनी केलेला आहे.[१५] १९५०च्या शेवटी, पीआरसीला तिबेटमधल्या त्यांच्या अस्तित्वाबद्दल अधिक विश्वास निर्माण झाला आणि त्यांनी तिबेटी समाजावर नियंत्रण कडक करण्याची सुरुवात केली. १९५९मध्ये दलाई लामा तिबेट सोडून गेल्यावर पीआरसीने प्रतिगामी धोरणे आणली. दलाई लामांच्या पलायनानंतर माओच्या सरकारने अनेक मठ बंद पाडले आणि उच्च स्थानावरच्या धार्मिक व्यक्तींची संपत्ती जप्त केली. मठ उध्वस्त करणे, भिक्कूंना तुरुंगात डांबणे आणि सांस्कृतिक क्रांतीच्या काळातच (१९६६-७६) दर्शनावर बंदी घालणे याचे व्यवस्थित राखलेले पुरावे उपलब्ध आहेत. चीनमध्ये असलेल्या इतर संघटित धर्मांप्रती (प्रोटेस्टंट, कॅथॉलिक, इस्लाम आणि ताओ) जो दृष्टीकोन होता, तोच इथेही लागू केलेला होता. थोडक्यात, कट्टर मार्क्सवाद थोडा लांब ठेवत, माओ झेडाँगच्या काळातले धार्मिक धोरण हे सामान्यत: आणि विशेषकरून तिबेटसाठी अंतर्गत राजकी स्थैर्य आणि राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य देऊन आखले गेलेले होते. पीआरसीच्या पुढच्या धार्मिक धोरणाचे हेच मूलभूत स्तंभ राहिले आहेत.

माओच्या निधनानंतर पीआरसीच्या धार्मिक धोरणाचा पुढचा टप्पा सुरू झाला. सांस्कृतिक क्रांतीच्या वेळी चीनमधल्या धार्मिक स्थळांची नासधूस केली गेली आणि कडक धार्मिक दडपशाही झाली, हे मार्च, १९८२ मध्ये पार्टीच्या केंद्रीय समितीने अधिकृतपणे मान्य केले. "आमच्या देशाच्या समाजवादाच्या काळात धार्मिक प्रश्नावरचा मूलभूत दृष्टीकोन आणि धोरण" असा फार महत्त्वाचा ठराव संमत करण्यात आला. [१६] या ठरावाला डॉक्युमेन्ट १९ असे म्हणले जाते. डेंग शाओपिंगच्या नेतृत्वाखाली धार्मिक धोरणाचे हे नवीन मार्गदर्शक तत्त्व झाले. पीआरसीत धर्माचे अस्तित्व आहे, त्याची व्याप्ती मोठी आहे आणि सीमेवर असलेल्या प्रांतांच्या वांशिक प्रश्नात तो गुंतलेला आहे, हे डॉक्युमेन्ट १९ मध्ये मान्य करण्यात आले. [१७] पीआरसीच्या सुधारित धार्मिक धोरणावर डेंगने एकच प्रश्न उपस्थित केला आणि त्याच प्रश्नाचे उत्तर म्हणून या धार्मिक धोरणाची निर्मिती झाली. तो प्रश्न होता, "राष्ट्रीय पातळीवर स्थैर्य आणि वांशिक एकात्मता साध्य करण्याचा प्रयत्न करत असताना, आणि त्याच वेळी परदेशातून विरोधकांच्या घुसखोरीला प्रतिबंध करत आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करत असताना आपण हा धार्मिक प्रश्न नीट हाताळू शकतो का? [१८] माओप्रमाणे अंतर्गत (सामाजिक स्थैर्य) आणि आंतरराष्ट्रीय (राष्ट्रीय सुरक्षा) पैलू विचारात घेऊन डेंगने सामाजिक सुधारणा आणि जगासाठी दरवाजे खुले करणे या धोरणात्मक गरजांशी धार्मिक धोरणाची सांगड घातली.

मान्यताप्राप्त धार्मिक संघटनांना पीआरसीने धार्मिक कार्यक्रम करण्याची परत परवानगी दिली, पण त्यावर काही मर्यादेपर्यंत बंधनेही घातली. १९८२ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क संविधानाद्वारे देण्यात आला (पीआरसीचे संविधान चॅप्टर ॥, आर्टिकल ३६). [१९] पण धार्मिक संघटनांना सरंजामशाहीतले कोणतेही मान परत दिले गेले नाहीत. कम्युनिस्ट पार्टीच्या प्रमुखाला धार्मिक कारणांनी विरोध करू देण्याचे स्वातंत्र्यही धार्मिक गटांना मिळाले नाही आणि त्यांनी राष्ट्रीय किंवा वांशिक एकात्मतेत फूट पाडण्याचा प्रयत्न करू नये, असेही स्पष्ट लिहिण्यात आले. या व्यापक धार्मिक धोरणांतर्गत पीआरसीने दलाई लामांशीही परत संवाद सुरू केला. १९७९ मध्ये, डेंगच्या मान्यतेनंतर पीआरसीने त्यांचे बंधू, ग्यालो थोंडुपद्वारे त्यांच्याशी संपर्क साधला.[२०] बीजिंगला असे वाटत होते, की दलाई लामा तिबेटमध्ये परतले, तर चीनने त्या प्रदेशावर केलेल्या कब्जाला स्वायत्त दाव्याचे स्वरूप देता येईल. दलाई लामांचे प्रतिनिधी आणि थोंडुप चर्चेच्या दोन फेऱ्यांना उपस्थित राहिले (१९८२ आणि १९८४ मध्ये). पण पीआरसी आणि दलाई लामांमध्ये दीर्घ संवाद होऊ शकला नाही. पुढे, जून, १९८८ मध्ये दलाई लामांनी तिबेटचा प्रश्न स्ट्रासबुर्ग इथल्या युरोपीय संसदेत मांडला आणि त्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप देऊन चीनवरचा दबाव वाढवला. प्रत्युत्तर म्हणून दलाई लामा "फूट पाडणारे" आहेत असा आरोप पीआरसीने केला. पण, व्यापक धार्मिक धोरणानुसारच पीआरसीने तिबेटी बौद्ध धर्माचे धोरण आखले.[२१] १९८० पासून चिनी धोरणाने उलट तिबेटचा समावेश आर्थिकदृष्ट्या चीनशी करण्याला प्राधान्य दिले, जेणेकरून तिबेटी जनतेच्या मनातून धर्म आणि दलाई लामा यांचा पगडा थोडा कमी होईल.

१९९०च्या दशकात चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर धार्मिक पुनरुत्थान सुरू झाले. धार्मिक व्यवहारांचे व्यवस्थापन करण्यासाठी नियमावली तयार करण्यात आली. धार्मिक व्यवहारांवर निर्बंध घालण्यासाठी पार्टीच्या केंद्रीय समितीने (१९९१ चे डॉक्युमेन्ट ६) नियंत्रण वाढवले. १९९४ मध्ये राज्यांमधल्या धार्मिक व्यवहारांचे व्यवस्थापन करण्यासाठी नियमावली तयार करण्यात आली (डॉक्युमेन्ट १४४). त्यानुसार, सर्व धार्मिक संघटनांना स्थानिक सरकारकडे नोंदणी करून, त्यांच्यावर कोणतेही परदेशी नियंत्रण नाही, याचे प्रकटीकरण करणे बंधनकारक केले. १९९५ मध्ये (फा लन

गाँगसहित) पंधरा धार्मिक गटांवर “दुष्ट पंथ” म्हणून बंदी घालण्यात आली. [२२] १९९७ मध्ये राज्य परिषदेने चीनमध्ये असलेल्या धार्मिक स्वातंत्र्याबद्दल श्वेतपत्रिका काढली. सर्व धर्मांनी कायद्याच्या परिघाच्या आत राहूनच व्यवहार करावेत, असे त्यात लिहिले होते. पण ही कडक बंधने घातली, तरी धार्मिक व्यवहार कार्यालयाचे प्रमुखपद मान्य करणारे संघटित धर्म आणि बीजिंगने मान्यता दिलेल्या देशभक्त धार्मिक संघटनांच्या बाबतीत परिषदेने थोडी नरम भूमिका घेतली. डिसेंबर २००१ मध्ये भरवलेल्या धार्मिक व्यवहारांच्या राष्ट्रीय परिषदेत सचिव जिआंग झेमिन यांनी धर्माच्या “मार्गदर्शना”ची गरज व्यक्त केली, पण त्याच वेळी धार्मिक धोरणाचे पालन अधिकाऱ्यांनी करावे आणि चीनमधून धर्माचे उच्चाटन करण्यासाठी प्रशासकीय पावले उचलू नयेत, याची आठवण करून दिली.[२३] या सौम्य हाताळणीचे प्रतिबिंब तिबेटी बौद्ध धर्माच्या बाबतीत दिसून आले. जिआंग झेमिन यांच्या अध्यक्षपदाच्या काळात दलाई लामांच्या प्रतिनिधीशी अनौपचारिक संपर्क साधण्यात आला होता. त्याचे फलित म्हणून सप्टेंबर, २००२ मध्ये पार्टीच्या युनायटेड फ्रंट वर्क डिपार्टमेन्ट आणि दलाई लामांचे मुख्य प्रतिनिधी, लोदी ग्यारी यांच्यामध्ये औपचारिक संवाद सुरू झाला.[२४]

जिआंग यांचे उत्तराधिकारी, हु जिंताओ यांच्या काळात चीनचे एकंदर धार्मिक धोरण परत बदलले. धार्मिक स्वातंत्र्यावर निर्बंध घालण्याचे संकेत सर्व प्रथम २००४ मध्ये मिळाले. राज्य परिषदेने “धार्मिक व्यवहारांची नियमावली” नामक आदेश क्र. ४२६ (डॉक्युमेन्ट ६) काढला.[२५] या नियमावलीनुसार देशाची सामाजिक व्यवस्था बिघडवण्यासाठी चीनमध्ये धर्माचा वापर करण्यात येणार नाही (कलम ३), नवीन धार्मिक संस्थांची स्थापना करायची असेल तर त्यावर वाढीव नियम, धार्मिक कार्यक्रमांवर आणखी कडक नियम (कलम ८ आणि १२) अशा नियमांचा समावेश होता. शिवाय, धर्मगुरूंना राज्यस्तरीय अधिकाऱ्यांकडून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक केले गेले (कलम २९). नवीन नियमावलीने बाह्य संपर्कावर बंदी घातली नाही, पण तो विनाशर्त असणे मात्र बंधनकारक केले गेले.[२६] तिबेटी बौद्ध धर्मासाठी २००४ ची नियमावली महत्त्वाची होती, कारण पहिल्यांदाच उच्चपदस्थ तिबेटी लामांच्या निवडीच्या अटी घालण्यात आल्या होत्या. डॉक्युमेन्ट ६ च्या कलम २७ नुसार : “तिबेटी बौद्ध धर्माच्या बुद्धावताराची संपत्ती आणि वारसा यांबाबतचा निर्णय बौद्ध गटांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक कर्मकांड आणि परंपरागत प्रथा पाळून घेतला जाईल आणि त्याचे वार्तांकन सरकारच्या धार्मिक व्यवहार विभागाला केले जाईल. [२७] तिबेटी बौद्ध धर्मामधल्या लामांच्या पुनर्जन्माच्या श्रेणीवर केंद्रीय प्रमुख लक्ष ठेवून आहेत याचे हे प्रथम संकेत होते. २००४ च्या नियमावलीत बुद्धावताराच्या निवडीच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशिष्ट राज्यस्तरीय प्रक्रियेचा अंतर्भाव केलेला नसला, तरी कलम २७ मध्ये निवडप्रक्रियेच्या विशिष्ट नियमांचा समावेश पुढे केला गेला.

२००७ मध्ये राज्य धार्मिक व्यवहार विभागाने आदेश क्र. ५ जारी केला, ज्याचे शीर्षक होते, “तिबेटी बौद्ध धर्मात पुनर्जन्म घेणाऱ्या बुद्धावताराचे व्यवस्थापन करण्यासाठी उचलण्यात येणारी पावले.” या नावातूनच स्पष्ट होत होते, की बुद्धावताराची निवड आणि नियुक्ती या संपूर्ण प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याचा केंद्र सरकारचा हेतू होता.[२८] या नियमावलीनुसार, तिबेटमधले नोंदणीकृत मठच केवळ बुद्धावतारासाठी अर्ज करू शकणार होते (कलम ३). अवताराच्या शोधाचे किंवा त्याला मान्यता देण्याचे काम कोणताही गट किंवा व्यक्ती राज्य अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय करू शकणार नव्हती (कलम ७). पूर्वपरवानगीशिवाय जर कोणी बुद्धावताराचा शोध घेण्याचे काम सुरू केले, तर तो एक गुन्हा समजला जाईल आणि त्याकरता कठोर शिक्षा दिली जाईल (कलम ११). याशिवाय, असेही स्पष्ट लिहिलेले होते, की “मोठा प्रभाव असलेल्या” दलाई लामांसारख्या बुद्धावतारांना पीआरसीची सर्वोच्च समितीच मान्यता देऊ शकते (कलम ५ आणि ९).[२९] १ सप्टेंबर, २००७ पासून सर्वच बुद्धावतारांच्या पुनर्जन्माच्या प्रक्रियेवर चीनच्या केंद्र सरकारचे संपूर्ण नियंत्रण आहे.

बुद्धावतारासाठी विशिष्ट नियमावली करण्याच्या पार्टीच्या निर्णयात, दलाई लामा आणि पीआरसी यांच्या समेटामध्ये प्रगती होऊ शकली नाही, हा एक घटकही होता. २००२ ते २०१० पर्यंत दलाई लामांचे प्रमुख प्रतिनिधी असलेल्या लोदी ग्यारी यांच्यानुसार जुलै २००५ मध्ये झालेल्या चर्चेच्या चौथ्या फेरीपर्यंत दोन्ही बाजू समाधानी होत्या. पण त्यानंतर चीनने दलाई लामांच्या विरोधात प्रचार करणारी मोहीम सुरु केली आणि चीनने आपला दृष्टीकोनही कठोर केला. २००८ मध्ये तिबेटमध्ये मोठे दंगेही झाले याचाही तो परिणाम असू शकतो.[३०] यामुळे, चीनच्या अटी दलाई लामांनी मान्य करणे अवघडच झाले. संवादाच्या माध्यमातून तिबेटच्या प्रश्नावर दोन्ही बाजूंना मान्य होईल असा तोडगा काढण्याची चीनची आशा दलाई लामांच्या वाढत्या वयाप्रमाणे कमी होत गेली असावी आणि म्हणून पीआरसीच्या धोरणात बदल झाला असावा. १९९० च्या सुरुवातीला ११व्या पंचेन लामांच्या निवडीच्या वेळी वादंग उठला होता, याचे कदाचित चिनी नेत्यांना स्मरण झाले असावे. त्यामुळे, दलाई लामांच्या अवताराबाबत तसे काही होऊ नये, म्हणून त्यांनी आधीच पावले उचलली असावीत.[३१]

२०१३ पासून चीनचे सद्य प्रमुख असलेले अध्यक्ष शी जिनपिंग यांनी चीनमधल्या सर्व धार्मिक व्यवहारांवर कडक निर्बंध लादलेले आहेत. पार्टीचे वर्चस्व परत एकदा निर्माण करून पार्टीच्या सत्तेसाठी घातक असलेल्या कल्पना वैमनस्य निर्माण करणाऱ्या कोणत्याही मार्गाने सुचवल्या जाऊ नयेत याचा बंदोबस्त करणे या त्यांच्या व्यापक योजनेचाच हा एक भाग आहे. २०१३च्या सुरुवातीला जारी केलेल्या द कम्युनिक ऑन द करंट स्टेट ऑफ द आयडिओलॉजिकल स्फीअर (डॉक्युमेन्ट ९) मध्ये असे स्पष्टपणे लिहिलेले आहे, की “वांशिक आणि धार्मिक मुद्द्यांचा वापर करून चीनमध्ये दुफळी निर्माण करणे” हे पार्टीच्या दीर्घकालीन वर्चस्वापुढे असलेले आव्हान आहे.[३२] त्याचा बंदोबस्त करण्यासाठी शी यांनी पावले उचलली. मे, २०१५ मध्ये त्यांनी युनायटेड वर्क फ्रंट नावाच्या परिषदेचे आयोजन केले, ज्यात त्यांनी चीनमधल्या सर्व धर्मांचे “चिनीकरण” केले जावे असे जाहीर आवाहन केले. एप्रिल, २०१६ मध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय रिलिजियस वर्क कॉन्फरन्समध्ये हे आवाहन परत एकदा करण्यात आले.[३३] ही प्रक्रिया कायदेशीर मार्गाने केली जाईल, असेही शी यांनी जाहीर केले.[३४] धार्मिक व्यवहारांचे राज्य शासनातले संचालक वांग झुओ’आन म्हणाले, की या “स्थानिकीकरणा”च्या प्रक्रियेकडे चीनमधल्या सर्व धर्मांना नेणे आवश्यक आहे.[३५] यानंतर अनेक कायदे आणि नियम करण्यात आले.

फेब्रुवारी, २०१८ मध्ये राज्य परिषदेने सर्व धार्मिक संघटना, शिक्षक आणि महाविद्यालये यांना राज्य सरकारकडे नोंदणी करणे अनिवार्य केले. शिवाय, धार्मिक महाविद्यालयांची स्थापना, धार्मिक शिकवणी किंवा सार्वजनिक स्थानांवर कोणतेही धार्मिक कार्यक्रम करण्याआधी शासनाची पूर्वपरवानगी घेणेही बंधनकारक केले.[३६] फेब्रुवारी, २०२० मध्ये मेझर्स फॉर द ऍडमिनिस्ट्रेशन ऑफ रिलिजियस ग्रुप्स या नावाने आणखी एक नियमावली जारी करण्यात आली. २०१८ च्या नियमावलीत, सर्व धार्मिक संघटनांनी सीसीपी प्रमुखांना पाठिंबा द्यावा, असे लिहिलेले होते. ते आता या नवीन नियमात बदलण्यात आले आणि सर्व धार्मिक संघटनांनी “सीसीपीचे प्रमुखपद जे सांगतील ते मान्य केलेच पाहिजे” (कलम ५) असा नवीन नियम करण्यात आला. शिवाय, सर्व धार्मिक संघटनांनी स्थानिक आणि केंद्र सरकारची देखरेख, सूचना आणि प्रशासन स्वीकारावे (कलम ६); पार्टीच्या सूचना आणि धोरणे यांचा प्रसार करावा आणि पार्टीच्या प्रमुखांना पाठिंबा देण्यासाठी अनुयायींना शिक्षित करावे आणि मार्गदर्शन करावे (कलम १७); आणि या कामासाठी अभ्यासगटांची स्थापना करावी (कलम २५) ही कलमेही बंधनकारक केली.

२०२० नंतर आलेल्या प्रत्येक नियमावलीने चीनमधल्या धार्मिक व्यवहारांवर आणखी बंधने आणली आणि धर्मांवर चिनी होण्याचा दबाव वाढवला. राज्याच्या परवानगीशिवाय स्थानिक पातळीवर तयार केलेल्या ऑनलाईन धार्मिक साहित्याच्या अनधिकृत प्रसारावर बंदी घालणे (मेझर्स फॉर द

ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ इंटरनेट रिलिजियस इन्फर्मेशन सर्व्हिसेस, मार्च २०२१), धार्मिक संघटनांच्या आर्थिक व्यवहारांवर पाळत ठेवण्यासाठी राज्यांना दिलेले अधिकार (मेझर्स ऑन फायनॅन्शियल मॅनेजमेन्ट ऑफ व्हेन्युज फॉर रिलिजियस ॲक्टिव्हिटीज, जून २०२१), अशा काही नियमावली जारी करण्यात आल्या. सर्व धार्मिक स्थळांवर शी जिनपिंग यांच्या विचारांचा अभ्यास अनिवार्य करण्यात आला (मेझर्स फॉर द मॅनेजमेन्ट ऑफ रिलिजियस ॲक्टिव्हिटी व्हेन्युज, सप्टेंबर, २०२३)[३७] चीनच्या आतल्या प्रत्येक धार्मिक व्यवहारावर राज्य आणि पार्टीचे नियंत्रण निश्चितपणे वाढत गेले, याचे प्रतिबिंब कायद्यांच्या भाषेतही पडले. २०१८ च्या नियमावलीत सीसीपीच्या प्रमुखांना पाठिंबा द्यावा यासाठी धार्मिक गटांना "मार्गदर्शन" करावे अशी शब्दयोजना होती. २०२० च्या नियमावलीत ती अधिक आदेशवजा झाली, सीसीपी प्रमुखांना पाठिंबा "दिलाच पाहिजे" असा बदल झाला. तर, २०२३ च्या ताज्या नियमावलीत सीसीपी प्रमुखांना केवळ पाठिंबा नाही, तर त्यांचे सर्वोच्च स्थान मान्य केलेच पाहिजे आणि धर्माचे चिनीकरण केलेच पाहिजे असे रोखठोक आदेश आहेत. यातून हे स्पष्ट होते, की पार्टी प्रमुखांना चीनमध्ये सुरू असलेल्या धार्मिक व्यवहारांची चिंता वाटायला लागलेली आहे. त्यांच्या दृष्टीने, राजकीय स्थैर्याला धक्का देऊ शकणाऱ्या या व्यवहारांवर अंकुश ठेवणे अत्यावश्यक आहे. कार,ण कोणतीही किंमत मोजून राजकीय आणि सामाजिक स्थैर्य टिकवून ठेवणे, हे कम्युनिस्ट पार्टी ऑफ चायनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

तिबेटच्या बाबतीत, तिबेटी बौद्ध धर्मामुळे धक्का लागण्याची चिंता अधिक आहे, कारण तिबेटी लोकांची वांशिक ओळख वेगळी आहे आणि ते सीमाप्रदेशात वास्तव्य करतात. २०२० मध्ये भरवलेल्या सातव्या तिबेट वर्क फोरममध्ये शी यांनी स्पष्ट केले, की मुख्यत्वे सुरक्षा आणि स्थैर्य कायम ठेवण्याच्या उद्देशाने तिबेटमध्ये चीनचे धोरण अवलंबले जाईल.[३८] याचाच अर्थ असा, की तिबेटी बौद्ध धर्मावर आणखी कडक निर्बंध लावले जातील.[३९] २०११ पासून सर्व तिबेटी मठांवर पार्टीच्या काही लोकांची कायमस्वरूपी नियुक्ती करण्यात आलेली आहे. २०१८ पासून सर्व स्त्री आणि पुरुष भिक्कूंना "राजकीयदृष्ट्या स्थिर" करण्याचे पद्धतशीर प्रयत्न सुरू झालेले आहेत.[४०] देशांतर्गत स्थैर्य कायम रहावे ही मुख्य चिंता पीआरसीच्या प्रत्येक धार्मिक धोरणात आणि तिबेटी बौद्ध धर्माच्या हाताळणीत डोकावते. तिबेटमध्ये वांशिक आणि भौगोलिक कारणांमुळे चीनच्या चिंतेत वाढ झालेली आहे. तिबेटच्या स्वतंत्र्य वांशिक ओळखीचा फायदा बाह्य शत्रू घेतील (आणि त्याला चीनपासून वेगळे करतील) या भीतीच्या आधारेच सुरुवातीपासून चीनचे धोरण तयार करण्यात आलेले आहे. अशी शक्यताही निर्माण होऊ नये, असे धोरण पीआरसीने कसे आखले आहे हे आपण दुसऱ्या भागात बघणार आहोत.

अंतर्गत स्थैर्याच्या चिंतेतून पीआरसी तिबेटी बौद्ध धर्माकडे बघत असल्यामुळे पुढच्या दलाई लामांच्या निवडीबाबत धोरण तयार करताना हाही मुद्दा (इतर मुद्द्यांच्या बरोबरीने) महत्त्वाचा ठरतो.

## भाग २ : अमेरिका, चीन आणि तिबेटी बौद्ध धर्म

चीनमध्ये अस्तित्वात असलेल्या धर्मांमुळे सामाजिक स्थैर्यावर होणाऱ्या परिणामांची चिंता हा मुद्दा बाजूला ठेवला, तरीही बाह्य शक्तींचा चीनच्या आत पडणारा धार्मिक प्रभाव हीदेखील कम्युनिस्ट पार्टीला सतावणारी चिंता आहे. पार्टीची अशी धारणा आहे, की कॅथॉलिक आणि प्रोटेस्टन्ट अशा पाश्चिमात्य धर्मांना "मोठ्या कालावधीपासून वसाहतवाद्यांनी आणि साम्राज्यवाद्यांनी नियंत्रणात ठेवून वापरलेले आहे."[४१] १९४९ मध्ये पीआरसीने पाश्चिमात्य मिशनरींना देशातून हाकलून दिले आणि "देशभक्त" धार्मिक संघटनांची स्थापना करून धार्मिक प्रश्न राज्याच्या थेट देखरेखीखाली

आणले.[४२]

तिबेटचा विचार केला, तर त्याच्या वांशिक स्वतंत्रतेमुळे पीआरसीची चिंता वाढलीच. तिबेटला चीनपासून तोडण्यासाठी बाह्य शक्ती तिबेटी बौद्ध धर्माचा वापर करतील, अशी चिंता पीआरसीला वाटते. पार्टीच्या मते, १९११ नंतर ब्रिटिशांनी तिबेटची विशिष्ट आणि स्वतंत्र ओळख असावी यासाठी प्रयत्न सुरू केले. तिबेट चीनच्या "अधिपत्या"खाली आहे, ती चीनची "स्वायत्त" भूमी नाही अशी भूमिका घेऊन थेट दलाई लामांच्या शासनाशी त्यांनी संबंध प्रस्थापित केले.[४३] पीआरसीच्या मते, भारतातून माघार घेतल्यानंतरही अमेरिकेने "तिबेटला स्वातंत्र्य" या मुद्द्याला हवा देऊन तिबेटला चीनपासून तोडायचे प्रयत्न सुरू ठेवले.[४४] म्हणून, अमेरिकेचे धोरण आणि पीआरसीच्या दलाई लामांप्रती असलेल्या धोरणाचा त्याच्यावर पडलेला प्रभाव तपासणे आवश्यक ठरते.

अमेरिकेचे तिबेटबाबतचे धोरण मिश्र आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी तिबेटच्या स्थितीबद्दल अमेरिका आणि ब्रिटिश सरकार यांच्यात एकमत नव्हते. जुलै, १९४२ मध्ये ब्रिटिश सरकारला लिहिलेल्या पत्रात अमेरिकेच्या सरकारने असे मत व्यक्त केले होते, की "बहुतांश वेळा अमेरिकेच्या सरकारने हे लक्षात ठेवले आहे, की चीन सरकारचे तिबेटवर अधिपत्य आहे. चीनच्या प्रदेशात तिबेटचा समावेश चीन संविधानाने केलेला आहे. या सरकारने त्या दाव्यांबाबत कधीच प्रश्न उपस्थित केलेला नाही."[४५] १९४९ मध्ये जेव्हा दलाई लामांनी स्वतंत्र तिबेटची मागणी केली, तेव्हाही अमेरिकेने त्यांच्या विनंतीला पाठिंबा दर्शवला नाही.[४६] १९५० च्या दशकाच्या सुरुवातीला, कोरिया युद्धानंतर अमेरिकेचे धोरण बदलले. दलाई लामांनी सतरा मुद्द्यांचा करार (१९५१) अव्हेरावा आणि पलायन करावे अशी अमेरिकेची इच्छा झाली. त्यानंतर "स्वायत्त तिबेटचे मुख्य" म्हणून अमेरिका दलाई लामांना स्वीकृती देण्यासाठी तयार झाली.[४७] पन्नासच्या दशकात पूर्व तिबेटमध्ये झालेल्या खंपा क्रांतीला अमेरिकेच्या सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सीचे वित्तीय सहाय्य केले. ती क्रांती फसली, पण तिबेटच्या विशेष स्थितीला मान्यता देण्याच्या दिशेने अमेरिकेने पहिले पाऊल उचलले. १९५९ नंतर दलाई लामांना लिहिलेल्या पत्रात तर स्पष्टपणे लिहिलेले होते, की तिबेटी लोकांनी स्वत:चा निर्णय स्वत: घ्यावा. हे तत्त्व आचरणात आणण्यासाठी अमेरिकन सरकार तिबेटी लोकांना जाहीरपणे पाठिंबा देण्यासाठी तयार आहे.[४८]

अमेरिका-चीन संबंध वाढल्यानंतर अमेरिकेने तिबेटच्या प्रश्नाची उपेक्षा केली. १९७० मध्ये दलाई लामांना अमेरिकेला भेट देण्याची इच्छा होती. तेव्हा अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार हेन्री किसिंगर म्हणाले, "तिबेटला स्वतंत्र होण्याची आकांक्षा आहे. आपण त्या आकांक्षांशी जवळीक दाखवली. तर आपल्या तैवान धोरणात त्याचा अडथळा येईल आणि कम्युनिस्ट चीनशी आपले संबंध सुधारण्याची शक्यताही कमी होईल."[४९] मग निक्सन प्रशासनाने या प्रश्नातून हातच काढून घेतले आणि १९९० च्या प्रारंभीपर्यंतच्या पुढच्या शासनांनीही तोच कित्ता गिरवला.

१९८०चे दशक संपत असताना अमेरिकेच्या काँग्रेसने तिबेटी बौद्ध धर्माच्या प्रश्नात परत लक्ष घातले. शीत युद्धाची समाप्ती झाल्यानंतर व्हाईट हाऊसमध्ये दलाई लामांचे स्वागत करणारे बिल क्लिंटन पहिले अमेरिकन अध्यक्ष होते.[५०] तिबेटी बौद्ध धर्मासह चीनमधल्या धार्मिक स्वातंत्र्याचा प्रश्न क्लिंटन यांनी चीनचे अध्यक्ष जिआंग झेमिन यांच्यापाशी उपस्थित केला. सर्व चिनी नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य आहे, असे ऑक्टोबर, १९९७ मध्ये वॉशिंग्टनमध्ये भरवलेल्या एका पत्रकार परिषदेत अध्यक्ष जिआंग झेमिन म्हणाले.[५१] जून, १९९८ मध्ये बीजिंगमध्ये क्लिंटन यांच्याबरोबरच्या दुसऱ्या पत्रकार परिषदेत ते स्पष्टपणे म्हणाले, की चीनच्या संविधानात धार्मिक स्वातंत्र्यासंबंधी जे हक्क आहेत, ते तिबेटलाही लागू आहेत. ते म्हणाले, "तिबेट हा चीनचा एकसंध भाग आहे, असे सार्वजनिकरित्या दलाई लामा कबूल करत असतील तर संवाद आणि समेटाचे दार कायम खुले आहे. खरे तर दलाई लामांशी संवादाचे अनेक पूल खुले आहेत."[५२] दलाई लामांचे प्रतिनिधी

आणि पार्टीच्या युनायटेड फ्रंट वर्क डिपार्टमेन्ट यांच्या दरम्यान गुप्त चर्चा परत सुरू झाल्या आहेत, यालाही त्यांनी पुष्टी दिली.[५३] क्लिंटन यांच्या दुसऱ्या कार्यकाळात तिबेटसंबंधी व्यवहारांवर लक्ष ठेवण्यासाठी एका विशेष समन्वयकाची नियुक्ती करण्यात आली होती. २००० साली नव्याने स्थापन झालेल्या काँग्रेशनल एक्झेक्युटिव्ह कमिशन ऑन चायनाला, चीन मानवी हक्कांचे संवर्धन करते ना याची नियमित छाननी करायचे काम दिले गेले. या कामासाठी तिबेटच्या विशेष समन्वयकाला सहकार्य करण्याचीही विनंती करण्यात आलेली होती.[५४] तिबेट प्रश्नात अमेरिका स्वत:हून परत लक्ष घालायला लागली होती, याचा हा संकेत होता.

२००२ मध्ये अमेरिकेच्या काँग्रेसने तिबेटन पॉलिसी ॲक्ट (टीपीए) नावाचा कायदा मंजूर केला. लोदी ग्यारी यांच्या शब्दांत, “हा केवळ काँग्रसने पारित केलेला ठराव नाही, तर बंधनकारक कायदा आहे. त्यामुळे अमेरिका आता त्यावर ठोस कृती करेल.”[५५] अमेरिकेचे तिबेटबाबत काय धोरण असायला हवे, हे त्यात आखलेले होते. त्यातून, ऑफिस ऑफ स्पेशल कोऑर्डिनेटर फॉर तिबेटन अफेअर्स या नवीन पदाची निर्मितीही झाली. याद्वारे अमेरिका चीन सरकारला दलाई लामांबरोबर संवाद सुरु ठेवण्यासाठी अधिकृत प्रोत्साहन द्यायला लागली आणि तिबेटी ओळख कायम रहावी याकरता आर्थिक मदतही करायला लागली.

२००२ साली टीपीए आल्यापासून तिबेटचा प्रश्न आता राजकीय मुद्दा झालेला आहे. अमेरिकेने तिबेटसाठी तिबेटन पॉलिसी ॲन्ड सपोर्ट ॲक्ट (टीपीएसए) असा आणखी एक कायदा केला, ज्यावर डिसेंबर, २०२० मध्ये अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सही केली. तिबेटी नागरिकांना धार्मिक पद्धती आणि परंपरांनुसार त्यांचे स्वत:चे धार्मिक गुरू निवडण्याचा, त्यांना शिक्षण देण्याचा, त्यांची पूजा करण्याचे स्वातंत्र्य आहे, यावर या कायद्याने शिक्कामोर्तब केले. तिबेटी बौद्ध धर्माची जी अवतार निवडीची प्रक्रिया आहे, ती पीआरसीने मान्य करावी असेही आव्हान त्या कायद्याद्वारे केले गेले. या कायद्यात असेही लिहिले होते, की पीआरसी अवतार निवडीच्या प्रक्रियेत जो अडथळा आणत आहे, तो “तिबेटी बौद्धधर्मीय आणि तिबेटी जनता यांच्या संविधानिक धार्मिक स्वातंत्र्याचे स्पष्ट उल्लंघन आहे”. पुढे, “पीआरसीच्या शासनातले जे अधिकारी किंवा खुद्द चायनीज कम्युनिस्ट पार्टी जर १५व्या दलाई लामाच्या निवडीत आणि नियुक्तीत थेट अडथळा आणत असेल, तर सरकारने योग्य ते उपाय करावेत आणि त्या अधिकाऱ्यांना उत्तरदायी ठरवावे”, असेही त्यात लिहिलेले आहे.[५६] तिबेटचा बुद्धावतार निवडण्याच्या पीआरसीच्या प्रयत्नांना विरोध करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या बाजूचा संघ बळकट करण्याचे काम विशेष समन्वयकाला दिले गेले. शिवाय, भविष्यातले दलाई लामाही तिबेटी बौद्धधर्मीयांपैकीच एक असतील याची खात्री करायचे कामही त्याच्यावर सोपवले गेले. थोडक्यात, टीपीएसए २०२० या कायद्याने दलाई लामांच्या अवताराबाबत पीआरसीच्या विरोधात भूमिका घेतली.

जुलै, २०२४ मध्ये अध्यक्ष जो बायडेन यांच्या सहीने तिसरा कायदाही अस्तित्वात आला. प्रमोटिंग अ रेझोल्युशन टू द तिबेट-चायना डिस्प्युट ॲक्ट (लघु नाव- रिझॉल्व तिबेट ॲक्ट) असे त्याचे नाव आहे. दलाई लामांबद्दल चीन जे चुकीचे वार्तांकन करतो, त्याला विरोध करण्यासाठी या कायद्यात विशेष आर्थिक तरतूद केलेली आहे. कोणत्याही पूर्वअटींविना पीआरसीने दलाई लामांशी अर्थपूर्ण आणि थेट संवाद साधावा असे आवाहन त्यात करण्यात आलेले आहे. टीपीएसए, २०२० द्वारे विशेष समन्वयकाला दिलेले अधिकार अबाधित आहेत. “हा उद्देश साध्य करण्यासाठी त्याने विविध पातळ्यांवरुन इतर सरकारांशी समन्वय साधावा” असा त्याला अधिकार दिलेला आहे.[५७] हा कायदा महत्त्वाचा आहे, कारण “प्राचीन काळापासून तिबेट हा चीनचा भाग आहे, अशी भूमिका अमेरिकेच्या शासनाने कधीच घेतलेली नाही” असे त्यात स्पष्ट लिहिलेले आहे. पीआरसीने तिबेट म्हणजे केवळ तिबेटन ऑटोनॉमस रीजन (टीएआर)अशी जी तिबेटची अधिकृत, मर्यादित संज्ञा केलेली आहे, त्यालाही आव्हान दिलेले आहे. या कायद्यानुसार, तिबेटच्या संज्ञेत टीएआर तर येतोच, शिवाय त्यात

चीनमधल्या इतर तिबेटी प्रदेशांचाही (किनघाय, गान्सू, सिचुआन अणी युनान) समावेश होतो.[५८]

२००२ पासून तिबेटबाबत केलेल्या या तीन कायद्यांद्वारे अमेरिकेने चीनने तिबेटवर केलेल्या अतिहासिक दाव्यांवर संशय व्यक्त केला, भविष्यातील दलाई लामांची निवड आणि नियुक्तीवर पीआरसीच्या देखरेखीच्या हक्काला आव्हान दिले आणि चीनच्या कथनाला विरोध करण्यासाठी विशेष समन्वयकाची नेमणूक करुन या मुद्द्याला आंतरराष्ट्रीय स्वरुप दिले. इतर विदेशी शासनांनीही चीनवर दबाव टाकून त्याला दलाई लामांशी बिनशर्त संवाद सुरु करायला लावावा, असा अमेरिकेचा प्रयत्न आहे. चीनने तीनही कायदे नामंजूर केलेले आहेत आणि विशेष समन्वयकाची नेमणूकही अमान्य केलेली आहे.[५९] चीनच्या परराष्ट्र खात्याने असे म्हणले आहे, की टीपीएसए, २०२० आंतरराष्ट्रीय संबंधांच्या संकेतांची पूर्ण पायमल्ली करतो आणि चीनच्या अंतर्गत बाबींमध्ये ढवळाढवळ करण्याचा तो एक प्रयत्न आहे.[६०] २०२४ च्या रिझॉल्व तिबेट ऍक्टबद्दल पीआरसीचे असे म्हणणे आहे, की चीनच्या अंतर्गत प्रश्नांमध्ये “कोणत्याही बाह्य शक्तींची ढवळाढवळ खपवून घेतली जाणार नाही” आणि “शीझांग (तिबेट) अस्थिर करुन कोणत्याही शक्तीने चीनची कोंडी करायचा किंवा त्याच्यावर दडपशाही प्रयत्न करु नये.”[६१]

२००२ साली टीपीए कायदा केला, तेव्हा अमेरिका-चीन संबंध आता आहेत त्यापेक्षा चांगले होते, तरी त्याचा गर्भित अर्थ चीनकडून सुटला नव्हता. अमेरिकेच्या तिबेटबाबत असलेल्या हेतूची त्याला चिंता वाटायला लागली. २००४ पासून पीआरसीने धार्मिक धोरणाबाबत एका पाठोपाठ एक जे कायदे केले (लेखाच्या पहिल्या भागात त्यांचा उल्लेख केलेला आहे) त्यात विदेशी ढवळाढवळ हा मुख्य मुद्दा होता आणि त्याला थांबवण्यासाठी पीआरसीने उचललेली ठाम पावले ठळकपणे दिसतात.

२००४ च्या चिनी कायद्यातले कलम ४ स्पष्टपणे सांगते, की विदेशी शक्तींचा धार्मिक व्यवहारांवर कोणताही प्रभाव असणार नाही.[६२] २००७ च्या नियमावलीतले कलम २ तिबेटमधल्या बुद्धावतारांच्या निवडीच्या प्रश्नाबाबत थेट भाष्य करते. “बुद्धावताराबाबत कोणतीही परकीय व्यक्ती अथवा संघटना ढवळाढवळ करणार नाही किंवा स्वत:चा प्रभावही त्यावर टाकणार नाही.”[६३] २०१३ मध्ये शी जिनपिंग अध्यक्ष झाल्यापासून या सर्व प्रक्रियेला विदेशी ढवळाढवळीपासून लांब ठेवण्याच्या पीआरसीच्या प्रयत्नांना वेग आला.

एप्रिल, २०१६ मध्ये (२००१ नंतर प्रथमच) भरवलेल्या धार्मिक कार्याच्या राष्ट्रीय परिषदेत शी यांनी चीनमधल्या सर्व धर्मांचे “चिनीकरण” केले पाहिजे असे आवाहन केले. ते स्पष्टपणे म्हणाले, “धार्मिक मार्गाचा अवलंब करुन परदेशातून घुसखोरी होणार नाही, यावर आपण कडक लक्ष ठेवले पाहिजे.”[६४] धार्मिक व्यवहारांचे राज्य शासनातले संचालक वांग झुओ’आन यांनी हाच मुद्दा पुढे नेला आणि म्हणाले, की पाश्चिमात्य देश धर्माचा वापर करुन पीआरसीत येण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांना या देशाची राजकीय पद्धतच बदलून टाकयची आहे.[६५] शी यांच्या नेतृत्वाखाली चीनच्या धार्मिक व्यवहारांमध्ये परदेशी हस्तक्षेप होण्याची शक्यताही खोडून काढणाऱ्या नवनवीन नियमावली जारी करण्यात येत आहेत. २०१८ पासून परदेशी लोकांना नवीन धार्मिक संघटना, धार्मिक संस्था किंवा धार्मिक स्थळे यांची स्थापना करण्याची मनाई करण्यात आलेली आहे. शिवाय, चिनी अनुयायींची भरती करण्याची अथवा पीआरसीच्या आत मिशनरी कार्याचा प्रसार करण्याचीही मनाई करण्यात आलेली आहे.[६६] २०२१ पासून परदेशी व्यक्ती किंवा संस्थांना चीनच्या पूर्वपरवानगीविना ऑनलाईन माध्यमातून धार्मिक सेवा देण्यावर बंदी आहे.[६७] ऍडमिनिस्ट्रेशन

ऑफ ऍक्टिव्हिटीज ऑफ ओव्हरसीज एनजीओज विदिन चायना असा वेगळा कायदाच त्यासाठी करण्यात आलेला आहे. त्या अन्वये परदेशी संस्थेला चीनच्या आत कोणत्याही धार्मिक कार्यामध्ये सहभागी होण्याला अथवा तिचे प्रायोजकत्व घेण्याची मनाई करण्यात आलेली आहे.

या नवीन नियमांची कडक अंमलबजावणी तिबेटमध्ये करण्यात येत आहे. परदेशी व्यक्तींचा सहभाग मर्यादित करण्यात आलेला आहे, त्याचबरोबर परदेशात दलाई लामांची प्रवचने असतील, तर त्यात सहभागी होणाऱ्या तिबेटी नागरिकांच्या प्रवासावरही बंधने आणलेली आहेत. चीनने नेपाळच्या सरकारवर दबाव टाकून तिबेटी भाविक आणि निर्वसितांसाठी त्याच्या सीमा बंद करायला लावल्या आहेत. स्व-दहन करण्याच्या किंवा त्याला प्रोत्साहन देण्याच्या प्रयत्नांना गुन्हेगारी कृत्य समजले जाते आणि कडक शिक्षाही केली जाते. अलीकडच्या काळात अशा घटनांचे प्रतिकूल पडसाद आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटल्यानंतर ही पावले उचलली गेली. मठांमध्ये नियुक्त केलेले अधिकारी स्त्री आणि पुरुष भिक्कूंना "देशभक्तीची शिकवण" देतात.[६८] पीआरसीने बुद्धावताराच्या निवडीच्या प्रक्रियेवर आपली पकड मजबूत केलेली आहे. एका चिनी स्रोतानुसार २०२२ संपत असताना पीआरसीच्या आत ऱ्याण्णव नवीन बुद्धावतार शोधण्यात आलेले आहेत आणि त्यांना मान्यताही मिळालेली आहे.[६९] आंतरराष्ट्रीय पातळीवरुन अनेक आवाहने करुन आणि अमेरिकेने कायदे केल्यावरही अध्यक्ष शी जिनपिंग यांनी दलाई लामांबरोबर संवाद परत एकदा सुरु केलेला नाही.

एकूण, एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून दलाई लामांच्या अवताराच्या मुद्द्याबाबत पीआरसी आणि अमेरिकेच्या कृतींमुळे या दोन्ही देशांच्या संबंधामध्ये अनेक तडे गेलेले आहेत. तिबेटमध्ये अमेरिकेचा हेतू नेमका काय आहे, याची चीनला चिंता वाटते. अमेरिका आणि इतर पाश्चिमात्य देशांमध्ये तिबेटच्या प्रश्नाला मोठा जनाधार आहे. त्यामुळे अवताराच्या मुद्द्यावर धोरण ठरवताना पीआरसीला या दोन मुद्द्यांचा विचार करावा लागत आहे. या प्रश्नाचे भांडवल होत आहे आणि चीन-अमेरिका स्पर्धेचाही तो भाग होत आहे. हे स्पष्ट दिसते, की तिबेटवर आपले नेमके किती नियंत्रण आहे, याची काळजी चीनला पडलेली आहे. शिवाय, अमेरिकेच्या हेतूबद्दलही त्याला चिंता वाटते आणि म्हणूनच त्याने तिबेट आणि दलाई लामा यांच्याबाबत कडक धोरणे आखली आहेत. याचे भारतावरही मोठे परिणाम होणार आहेत.

## भाग ३ : दलाई लामांबाबत भारत आणि चीन यांचे थोडक्यात दृष्टीकोन

भारत आणि तिबेट यांच्या दरम्यान अनेक शतके अध्यात्मिक आणि सांस्कृतिक संबंध होते. ब्रिटिश भारत सोडून गेल्यानंतर या दोन देशांमध्ये राजकीय संबंध प्रस्थापित झाले. एकोणिसावे शतक संपत असताना रशियाला दक्षिण आशियामध्ये आपले साम्राज्य वाढवण्यायची इच्छा होती. याची चिंता वाटून ब्रिटिशांनी तिबेटमध्ये लक्ष घातले. रशियाचे आक्रमण थोपवण्यासाठी हिमालयाच्या उत्तरेला एक ठाणे असणे आवश्यक होते. चीन आणि तिबेटच्या परस्पर संबंधांमुळे मुद्दा गुंतागुंतीचा झालेला होता. तिबेटवर स्वायत्त सत्ता आहे, असा चीनचा दावा होता, तर तिबेट चीनचा कधीच भाग नव्हता असे तिबेटचे म्हणणे होते. तिबेटची स्थिती नेमकी काय आहे, हा प्रश्न बाजूला ठेवून ब्रिटिशांनी तिबेटवर चीनचे "अधिपत्य" आहे, "स्वायत्तता" नाही असे मान्य केले. मग, १९१४ मध्ये १३व्या दलाई लामांच्या शासन काळात ब्रिटिशांनी हिमालयातल्या सर्वोच्च बिंदूवरुन जाणाऱ्या सर्वसंमत सीमेला भारत-तिबेट सीमा म्हणून मान्यता दिली.[७०]

१९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने दलाई लामांच्या शासनाशी संबंध सुरू ठेवले. १९४९ मध्ये भारताच्या पंतप्रधानांना एक प्रश्न पडला, जो त्यांनी लिखित स्वरूपात मांडलेला आहे: "चिनी कम्युनिस्ट शासनाला आव्हान दिले आहे, असे वाटणारे कोणतेही पाऊल न उचलता तिबेटी सरकारबरोबर मैत्रीपूर्ण संबंध कसे सुरू ठेवायचे."[७१] सीमा बदलली जाणार नाही, याची खातरजमा करणे यात भारताला अधिक स्वारस्य होते. दलाई लामांचे सरकार सुरू राहण्यानेच ते शक्य होणार होते.[७२] १९५० नंतर चीनने तिबेटचा ताबा घेतल्यावर भारताचे तर ते प्रमुख उद्दिष्ट झाले. दलाई लामांनी त्यानंतर बऱ्याच काळाने पलायन केल्यानंतर मग तोही घटक भारताच्या धोरणात आला.

याउलट, तिबेटवर कब्जा मिळवणे, हेच चीनचे प्रमुख उद्दिष्ट होते. पाश्चिमात्य देशांच्या ढवळाढवळीची त्याला चिंता वाटत होती. भारताचे संबंध ब्रिटिशांशी असल्यामुळे चीन भारताकडेही संशयानेच बघत होता. भारतही हस्तक्षेप करायला लागेल अशी भीती त्याला होतीच, पण पाश्चिमात्य देशांकडून भारतावर दबाव टाकला जाईल आणि त्यामार्गे तिबेटवर संपूर्ण नियंत्रण मिळवण्याच्या पीआरसीच्या उद्दिष्टावर अंकुश ठेवला जाईल, असेही चीनला वाटत होते. १९५०च्या दशकात पाश्चिमात्य देशांचा हस्तक्षेप तिबेटी व्यवहारांमध्ये वाढला, तेव्हा चिनी अधिकारी आणि माध्यमे यांनी भारत सरकारवर "चीनचे तिबेटमधले अस्तित्व खपवून न घेणाऱ्या पाश्चिमात्य देशांच्या प्रभावाखाली असलेला देश" असा आरोप केला. १९५९ मध्ये जी खळबळ झाली, त्याला पडद्यामागून भारताने पाश्चिमात्य देशांना मदत केली असाही आरोप चीनने केला.[७३]

आणखी एक गोष्ट नोंद घेण्यासारखी आहे. तिबेटमध्ये कोणत्याही परदेशी देशाची ढवळाढवळ पीआरसीने कधीही खपवून घेतलेली नसली, तरी पीआरसीच्या उद्दिष्टांना जेव्हा जेव्हा मदत हवी असायची, तेव्हा मात्र चीनने दलाई लामांबरोबर मध्यस्थी करायला भारताला विनंती केलेली आहे. मार्च, १९५१ मध्ये चीनचे भूतपूर्व अध्यक्ष, झोउ एनलाय यांनी व्यक्तीश: भारताला विनंती केली आणि सतरा मुद्द्यांच्या करारावर वाटाघाटी सुरू असताना दलाई लामांनी देश सोडून जाऊ नये म्हणून त्यांचे मन वळवायला सांगितले.[७४] १९५६ मध्ये जेव्हा दलाई लामा परत तिबेटला जाण्यासाठी तयार नव्हते (भगवान बुद्धाच्या २५००व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला हजेरी लावायला ते भारतात आले होते), तेव्हा झोउ यांनी थेट पंतप्रधान नेहरूंना फोन करून त्यांना परत जाण्याचा आग्रह करायला सांगितले. "दलाई लामा तिबेटपासून लांब असताना काहीतरी होऊ शकते. अमेरिका आणि तैवान काहीतरी चिथावणीयुक्त करू शकतात", असेही ते म्हणाले.[७५]

तिबेट आणि दलाई लामा यांच्या बाबतीत या इतिहासकालीन देवाणघेवाणीतून तीन मुख्य निष्कर्ष काढले जाऊ शकतात.

पहिला, सुरुवातीपासूनच भारत आणि चीनचे तिबेटबाबत हेतू वेगवेगळे होते. दलाई लामांच्या शासनावर आणि तिबेटी जनतेवर संपूर्ण नियंत्रण हे चीनचे प्राधान्य होते, आणि ती भारताची चिंताच नव्हती. भारताच्या दृष्टीने, त्याची सीमा बदलली जाणार नाही याची खातरजमा करणे हा मुख्य हेतू होता आणि त्यासाठी त्याने दलाई लामांशी संबंध ठेवलेले होते.

दुसरा, दलाई लामांवर भारताचा प्रभाव आहे, हे पीआरसीने स्वीकारले. त्यामुळे, गरज पडेल तेव्हा चीनने भारताची मदत मागितली. त्या वेळी, भारताने कोणतीही अट न ठेवता मदत करावी अशी अपेक्षाही त्याने ठेवली. पण, भारताच्या स्वारस्याच्या मुद्द्यांवर भारताने दलाई लामांशी संबंध ठेवावेत

हे मात्र चीनला कधीही मान्य नव्हते. थोडक्यात, “अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप नाही” हे तत्त्व चीनने स्वत:चा फायदा असेल, तेव्हाच वापरले.

तिसरा, तिबेटमधल्या आपल्या हेतूंवर अमेरिकेमुळे बाधा येईल याची प्रामुख्याने पीआरसीला चिंता वाटत असल्याने, भारत अलिप्त राहणे त्याच्या दृष्टीने गरजेचे होते. चीनला तिबेटमध्ये रोखण्यासाठी भारताची भूमी वापरली जाऊ नये याची खात्री त्याला करुन घ्यायची होती. १९५४ पर्यंत, भारताचा प्रभाव कमी होईपर्यंत त्याने सीमेबाबतच्या सवलती चालू ठेवल्या आणि सीमेचा विषय झुलवत ठेवला. १९५०च्या शेवटी, सीआयएने तिबेटमधून हालचाली सुरू केल्यावर, पीआरसीने भारतावर दबाव वाढवला, आणि अशा कृत्यांपासून अंतर राखण्यासाठी सांगितले. चीनने भारतावर थेट आरोप केले नाहीत (दलाई लामा तेव्हा भारतात आलेले नव्हते), पण भारत सरकारच्या तिबेटमधल्या हेतूबद्दल चीनचे प्रमुख नेहेमीच साशंक राहिले.

पीआरसीने भारताबरोबर दलाई लामांच्या विषयात हेच वर्तन सुरू ठेवले. पहिल्यांदा, चीनची तिबेटवर स्वायत्त सत्ता आहे हे भारतकडून मान्य करवून घेण्याकडे पार्टी लक्ष देते, जेणेकरून नंतर संदिग्धता राहत नाही.[७६] दुसरे म्हणजे, ती दलाई लामा भारतात आहेत, हे मान्य करते आणि कथित तिबेटी शासन (सेंट्रल तिबेटन ॲडमिनिस्ट्रेशन- सीटीए) सहन करते. त्या बदल्यात भारताची सीटीएला मान्यता नाही आणि भारताच्या भूमीतून दलाई लामा चीनविरोधी राजकीय चळवळ चालवत नाहीयेत, अशी ती भारताकडून नियमितपणे आश्वासने मागते.[७७] तिसरे, अमेरिकेने तिबेटवरच्या चीनच्या स्वायत्त सत्तेला उलथवून टाकण्यासाठी भारताची भूमी वापरु नये यासाठी ती प्रयत्नशील राहते. त्याच वेळेला, तिबेटला “स्वातंत्र्य” मिळावे म्हणून पाश्चिमात्य देशांनी जो “कट” रचला आहे, त्याचा भाग भारत नाहीये हेही ती सांगायला विसरत नाही आणि अशा पद्धतीने थेट आरोप न करुन भारताला “चिथावणी” देत नाही. उदा. मे, २०२१ मध्ये चीनच्या राज्य परिषदेने तिबेटवर जी श्वेतपत्रिका काढली, त्यात १९५०च्या खंपा क्रांतीत अमेरिकेबरोबर भारताचाही हात होता, असा आरोप केलेला नाही. त्याचबरोबर, १९५९ मध्ये तिबेटमध्येच जी क्रांती झाली, त्यातही भारताचा हात होता, असा थेट आरोप केलेला नाह.[७८] पीआरसीची अधिकृत विधाने सावधपणे केलेली असतात. दलाई लामांना भारत कोणत्याही राजकीय चळवळीत मदत करणार नाही, किंवा भारताच्या भूमीचा वापर चीनच्या शत्रूंना करू देणार नाही, ही भारताने दिलेली आश्वासने तो पाळेल, अशी आशा मात्र व्यक्त केलेली असते. जेव्हा भारतीय नेते दलाई लामांना भेटतात, तेव्हा पीआरसी बहुतांश वेळी मौन असते किंवा नावापुरता विरोध दर्शवते.

भारतात राहणाऱ्या तिबेटी निर्वासितांना भारताकडून सक्रीय मदत सुरू व्हावी यासाठी पीआरसी स्वत:हून कोणतेही कारण मिळू देत नाही. तसेच, चीन करत असलेल्या हद्दीच्या उल्लंघनाला चीनविरोधी पाश्चिमात्य देश भारताच्या भूमीतून विरोध करतील असे वातावरणच तयार होऊ न देण्याचा प्रयत्न पीआरसी करते. भारताप्रती धोरण तयार करताना चिनी नेत्यांनी ही उद्दिष्टे समोर ठेवलेली आहेत.

भारताच्या बाबतीत सांगायचे, तर दलाई लामांशी कोणतेही संबंध ठेवताना भारताने नेहेमीच उघडपणे तोलूनमापून भूमिका घेतलेली आहे. तिबेटी पद्धतीचे आयुष्य सुरळीत सुरू रहावे यासाठी आणि दलाई लामांचे अध्यात्मिक आणि धार्मिक कार्यक्रम विनाअडथळा चालू रहावे यासाठी भारत सजग राहिला आहे आणि त्याने पीआरसीला त्याच्या आड येऊ दिलेले नाही. भारताचे धोरण असे आहे, की ते एक आदरणीय अध्यात्मिक गुरू आहेत आणि त्यांचे धार्मिक कार्य सुरू ठेवायचे स्वातंत्र्य

त्यांना भारतात देण्यात आलेले आहे.[७१] वेळोवेळी भारतीय नेतेही अध्यात्मिक गुरू म्हणून दलाई लामांचे स्वागत करतात आणि विशेष प्रसंगी त्यांना शुभेच्छाही देतात. परदेशी अनुयायींना त्यांची प्रवचने ऐकण्याची आणि त्यांचे आशीर्वाद घेण्याचीही मुभा आहे. परदेशी सरकारी अधिकारी किंवा कायदा प्रतिनिधींच्या भेटीही भारताने कधी रोखलेल्या नाहीत, पण भारत स्वत:ला त्यांच्याशी जोडून घेत नाही किंवा त्यांना पुरस्कृतही करत नाही.

दलाई लामांच्या अवताराबाबत भारताने कोणतीही उघड भूमिका अजूनपर्यंत घेतलेली नाही. पण पीआरसीने निवडलेल्या बुद्धावतारांना (उदा. उग्येन थिनले दोर्जे, कथित १७वे कर्मपा लामा) बिनशर्त मान्यता देण्याची त्याची तयारी नाही, असेही भारताने दर्शवलेले आहे. भारतात राहून बुद्धावतारावर हक्क सांगणाऱ्यांना भारतात राहण्याची परवानगीही आहे. तिबेटी निर्वासितांना भारतात येण्याची मुभा दिली जाते, तिबेटी शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांना पाठिंबा दिला जातो आणि निर्वासितांना तिबेटी बौद्ध धर्माच्या रीती त्यांच्या इच्छेप्रमाणे आचरणात आणण्याचीही परवानगी आहे. तिबेटी समुदायाला विनाअडथळा भारतात साठ वर्षांपासून स्वत:ची संस्कृती जगता, आचरता आणि वाढवता आलेली आहे.

भारताने सीटीए किंवा तिबेटच्या कथित शासनाला अधिकृत मान्यता दिलेली नाही, पण तो त्यांच्या कायदेशीर हालचालींमध्ये ढवळाढवळ करत नाही. त्यांनी जी स्वत:च्या हक्कांची मागणी केलेली आहे त्यावर त्याने कोणतीही भूमिका घेतलेली नाही. या मुद्द्याबाबत बोलणी करण्यासाठी त्याने कोणालाही आवाहन केलेले नाही. एकूण, दलाई लामांना आश्रय देण्याचा आणि तिबेटी निर्वासितांच्या निर्वाहाचा संवेदनशील मुद्दा भारताने योग्य रीतीने हाताळला आहे. भारताचे हे धोरण पीआरसी सहन करते, कारण ते तिच्या धोरणाशी सुसंगत आहे.

१४व्या दलाई लामांचे वय वाढते आहे, त्याप्रमाणे, त्यांच्या निधनानंतर काय होणार हा प्रश्न अधिक गंभीर होत आहे. चीनने त्यांच्यावर “फूट पाडणारे” असा शिक्का मारलेला असला, तरी तेच सद्य, वैध दलाई लामा आहेत हे चीन आणि भारताला मान्य आहे. म्हणजे, या मूळ मुद्द्यावर दोन्ही देशांचे एकमत आहे. १५वे दलाई लामा म्हणून एकाहून अधिक बुद्धावतार पुढे आले आणि अवताराबाबत भारत आणि चीन यांमध्ये मतांतर झाले, तर मात्र प्रश्न निर्माण होईल. चीनच्या उमेदवारासमोर भारताच्या भूमीवर राहणारा अवतार उभा राहिला, तर पीआरसी ती भारताने चीनविरोधात केलेली कृती समजेल का, यावर तिचे पुढचे धोरण ठरेल. १५वे दलाई लामा होण्यासाठी इच्छुक असलेला उमेदवार पीआरसीच्या तिबेटवर असलेल्या नियंत्रणाबाबत काय भूमिका घेतो आणि त्याचवेळी चीन-अमेरिका संबंध कसे आहेत, यावर सारे काही अवलंबून असेल. तिबेट आणि दलाई लामांबद्दल धोरण ठरवताना भारताचा दृष्टीकोन आणि वर्तन यांना फार वजन चीनकडून दिले जाणार नाही. पण, बुद्धावताराच्या प्रश्नाची हाताळणी करताना, पुढच्या दलाई लामांच्या निवडीबाबत असलेली भारताची भूमिका हा घटक चीन लक्षात घेईल. १४व्या दलाई लामांनंतर तिबेटी निर्वासित, सीटीए आणि तिबेटी संसद यांच्या हालचाली जशा असतील, यावरही भारताबाबतचे धोरण अवलंबून असेल. आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटणारी प्रतिक्रियाही दोन्ही देशांच्या धोरणात प्रतिबिंबित होईल. म्हणूनच, भारतासमोर असलेल्या पर्यायांची चाचपणी करणे महत्त्वाचे ठरते.

# भाग ४ : उपलब्ध पर्याय

भारतात, दलाई लामांच्या प्रश्नाचे कुतुहल सामान्यांमध्ये वाढत चालले आहे. जून, २०२४ मध्ये टाइम्स ऑफ इंडिया या मुख्य धारेतल्या वर्तमानपत्राने एक लेख छापला, ज्यात दलाई लामांच्या पश्चात उद्भवणाऱ्या परस्थितीसाठी भारताने तयार व्हावे, असे सुचवले होते. तबिटी बौद्ध धर्मातल्या सर्वोच्च स्थानाचे हस्तांतरण होण्याच्या संवेदनशील काळात भारताने धाडसी तबिट धोरण आखावे आणि चीनला शह द्यावा, असे लेखात सुचवले होते.[८०] अशाच पद्धतीचे मत काही विद्वानांच्या लेखातही डोकावते. त्यांच्या मते, १४व्या दलाई लामांचे निधन झाले, की वारसाच्या निवडीची प्रक्रिया पीआरसीच्या नियंत्रणाखाली जाईल. तिने निवडलेला वारस तबिटच्या नागरिकांना पसंत पडेल याची शक्यता कमी आहे.[८१] वारसाच्या प्रश्नाबाबत भारताने स्पष्ट भूमिका घ्यावी, असे सुचवण्यात येत आहे. तबिटी निर्वासितांचीही ही मागणी आहे. २०२० मध्ये चीनने पूर्व लडाख भागात केलेल्या लष्करी हालचालींमुळे भारत-चीन संबंध जैसे-थे पातळीवर आल्यामुळे, भारताला सार्वजनिक मंचावरून तबिट धोरणाबाबत चर्चा सुरू करता आलेली नाही. त्यात, अमेरिकेने संमत केलेला रिझॉल्व तबिट ॲक्ट, २०२४ आणि चीनचा एकूणच मानवी हक्कांकडे बघण्याचा दृष्टीकोन यांमुळे वारसाच्या प्रश्नावर आता आंतरराष्ट्रीय पातळीवर चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

चायनीज कम्युनिस्ट पार्टी आणि पीआरसीला दलाई लामांच्या वारसा प्रश्नाबरोबर अंतर्गत स्थैर्य आणि राष्ट्रीय सुरक्षा यांचीही चिंता वाटते. त्यामुळे, दलाई लामा यांच्याबाबत भारताने पीआरसीच्या दिशेने कोणताही एकतर्फी निर्णय घेतला किंवा कृती केली, आणि चीन त्याकडे सकारात्मक दृष्टीनेच पाहील असे गृहित धरले, तर त्याचे फारसे बरे परिणाम बीजिंगमध्ये दिसणार नाहीत. त्यामुळे असे काहीही न केलेलेच बरे. पीआरसीला भारताच्या हेतूंबद्दल अविश्वास आहे, पण स्थैर्य आणि सुरक्षा विचारात घेता, तिने भारताचे सद्य धोरण स्वीकारले आहे. भारताने तबिटबाबत कसा दृष्टीकोन ठेवला पाहिजे, याबाबतीत चीनचे मत स्पष्ट आहे- भारताने चीनच्या चिंतेबद्दल संवेदनशीलता दाखवलीच पाहिजे, पण चीनने भारताला वाटणाऱ्या तबिटच्या चिंतेबाबत तसेच करणे गरजेचे नाही. त्यामुळे, चीनला खूश करण्यासाठी भारताने स्वत:हून काहीही करणे योग्य नाही, कारण त्यातून भारताला काहीही फायदा होणार नाही.

याचा अर्थ, अवतारच्या प्रश्नातून भारताने पूर्णपणे अंग काढून घेणेही योग्य नाही, कारण भारताच्या दृष्टीनेही त्याचे महत्त्व आहे. भारतात तबिटी बौद्ध धर्माचे मोठ्या प्रमाणावर अनुयायी आहेत आणि पुढच्या दलाई लामांच्या निवडीबाबत कोणताही वादंग झाला, तर त्याचे परिणाम भारतातही उमटतील. पीआरसीने तबिटी प्रश्नांची हाताळणी अयोग्यपणे केल्यामुळे, १९५९ पासून तबिटी नागरिक भारतात रहात आहेत. शिवाय, तबिटच्या सर्वोच्च अध्यात्मिक गुरूचे हस्तांतरण व्यवस्थित पद्धतीने व्हावे, हेच भारताच्याही भल्याचे आहे.

१४वे दलाई लामा हयात असतानाच भारत सरकारने काही विषयांवरच्या धोरणात्मक पर्यायांचा विचार करणे गरजेचे आहे.

पहिला पर्याय म्हणजे, भारताने दलाई लामांच्या अवताराबाबत मत मांडणे आवश्यक आहे. तबिटी बौद्ध समुदायाला राज्याच्या हस्तक्षेपाशिवाय त्यांचे अध्यात्मिक गुरू निवडण्याचा हक्क आहे का नाही? अजूनपर्यंत, भारताने हा विषय टाळलेला आहे. जर १४व्या दलाई लामांनी परत अवतार घ्यायचे ठरवले, तर त्याची प्रक्रिया भारतातच सुरू होऊ शकते.[८२] अर्थातच पीआरसी निषेध करेल आणि आंतरराष्ट्रीय समुदाय त्याचे स्वागत करेल. रीत आणि आचरणानुसार, भारतातल्या कोणत्याही धर्माच्या प्रमुखांच्या निवडीत भारत सरकार ढवळाढवळ करत नाही. तबिटी बौद्ध धर्म भारताच्या काही उत्तरी राज्यांमध्ये काही समुदायांकडून मानला आणि आचरला जातो. तबिटी बौद्ध समुदायाने त्याचे स्वत:चे अध्यात्मिक गुरू मुक्तपणे आणि कोणाच्याही हस्तक्षेपाविना निवडावेत, असे विधान योग्य वेळ येताच भारत सरकारने केले, तर ते आजवरच्या आचरणानुसारच असेल. २४ सप्टेंबर, २०११ रोजी दलाई लामांनी अवताराच्या प्रक्रियेबाबत केलेल्या विधानाला पुष्टी देणे, किंवा तबिटी समुदायाच्या इच्छेनुसार निवड प्रक्रियेच्या तपशीलात शिरणे भारताने गरजेचे नाही आणि ते आवश्यकही नाही.[८३]

दुसरा पर्याय म्हणजे, पीआरसी आणि दलाई लामा यांच्यामध्ये संवाद व्हायला हवा, अशा जनतेच्या मागणीला भारताने पाठिंबा द्यायला हवा का? भारत सरकारने अशा सार्वजनिक आवाहनांना जाहीर पाठिंबा दिलेला नाही. पण, जम्मू आणि काश्मीरचा प्रश्न सुटावा यासाठी संवाद सुरू केला पाहिजे, असे मत वेळोवेळी पीआरसीने व्यक्त केलेले आहे. हा मुद्दा अंतर्गत आहे आणि चीनला त्याबद्दल बोलायचा अधिकार नाही, असे भारतानेही वेळोवेळी स्पष्ट केलेले आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाकडून चीन आणि दलाई लामांमध्ये संवाद सुरू व्हावा अशी वाढती मागणी आहे. या मागणीला पाठिंबा देण्याबाबत भारताने विचार करावा. (चीनच्या सद्य तिबेट धोरणामुळे) तिबेटचा एक मोठा समुदाय भारतात जवळपास सहा दशकांपासून राहतो. म्हणून, भारताला तिबेटच्या भविष्याबाबत बोलण्याचा हक्क मिळतो. इतरांबरोबर हे करणे गरजेचे आहे, असेही नाही. पीआरसी भारताच्या या आवाहनाकडे लक्ष देईल याची शक्यता अगदीच कमी असली, तरी २०२२ मध्ये भारताचे परराष्ट्र मंत्री, एस जयशंकर यांनी गिरविलेल्या त्रिसूत्री धोरणाचाच तो पुढचा भाग असेल- परस्पर आदर, परस्पर संवेदनशीलता आणि परस्पर स्वारस्य.[८४]

तिसरा पर्याय म्हणजे, तिबेटी निर्वासितांना स्वतःचा निर्णय स्वतः घ्यायचा आहे. त्यांच्या या मागणीला भारताने पाठिंबा द्यावा का? भारताने याआधी अशा मागणीला पाठिंबा दिलेला नाही. जम्मू आणि काश्मीरबाबत भारताला वाटणाऱ्या चिंतेप्रती चीन संवेदनशीलता अजिबात दाखवत नाही. उलट, काश्मीरमधल्या लोकांच्या इच्छेप्रमाणे करावे, असे आवाहन तो भारताला सतत करत असतो. भविष्यात तसाच प्रसंग आला, तर भारतानेही चीन वापरतो तीच किंवा तशीच भाषा वापरण्याचा विचार करावा. स्वतःचा निर्णय स्वतः घेण्याच्या मुद्द्याला पाठिंबा देण्यापेक्षा हे वेगळे आहे. उलट, त्याच्या परदेश धोरणाबाबत चीन जी तत्त्व लागू करते, तीच त्याने अंतर्गत धोरणालाही लागू करावी हा मुद्दा इथे कौशल्याने पुढे मांडता येईल.

चौथा पर्याय म्हणजे, १४व्या दलाई लामांचे अवशेष भारतातच ठेवून इथे त्यांची समाधी बांधण्याची परवानगी भारताने द्यावी का? जर १४व्या दलाई लामांचे निधन भारतीय भूमीत झाले, तर अन्य काही पर्याय उरणार नाही. जर तसे झाले, तर १७०६ सालानंतर ल्हासाच्या पोटाला पॅलेसच्या बाहेर दफन केलेले ते पहिले दलाई लामा होतील.[८५] त्यांचे निधन भारतात झाले, तर त्यांच्या अवशेषांना भारतातच ठेवण्याशिवाय भारत सरकारकडे दुसरा पर्यायच राहणार नाही. ते गृहित धरून भारत सरकारने त्यांचे अवशेष जतन करता येतील अशी संभाव्य स्थाने आधीच निश्चित करावीत. १४व्या दलाई लामांचे अवशेष जतन केलेले ते स्थान लाखो अनुयायांसाठी पवित्र स्थान असेल, हे लक्षात ठेवून तसे स्थान निवडावे लागेल. त्या दृष्टीने, भक्तांच्या येण्याजाण्याची सोय आणि सामाजिक सुरक्षेचे निकष यांचाही नीट विचार करावा लागेल. पीआरसीचा असा दावा आहे, की दलाई लामा पलायन केलेले का होईना, पण पीआरसीचे नागरिक आहेत. त्यामुळे ल्हासामध्ये त्यांचे अवशेष पुरण्यासाठी त्यांची मागणी भारताकडे केली जाण्याची शक्यताही नाकारता येत नाही. भारत सरकारला यासाठी योग्य असे धोरणात्मक उत्तर तयार ठेवावे लागेल. हा मुद्दा कायदेशीर वळणही घेऊ शकतो हे लक्षात घेऊन पीआरसीच्या मागण्यांना भारताला उत्तर तयार ठेवावे लागेल.

पाचवा म्हणजे, १४व्या दलाई लामांचे निधन झाल्यानंतर आणि १५व्या दलाई लामांचा शोध पूर्ण होईपर्यंतच्या मधल्या कालावधीत भारत सरकारने काय केले पाहिजे? हा कालावधी अनेक महिन्यांचा असू शकतो. सीटीए आणि भारतातून सुरू असलेल्या तिबेटी संसदेशी नक्की कसा संवाद ठेवायचा, हे भारत सरकारला आत्तापासूनच ठरवावे लागेल, कारण तिबेटी समुदायाला भारतातून बाहेर काढता येणार नाही. त्यांच्या इथल्या अस्तित्वाने अंतर्गत, सामाजिक, कायदेशीर आणि इतर अनेक परिणाम होत असल्याने, त्यांच्याशी योग्य संबंध ठेवणे महत्त्वाचे आहे. एका अभ्यासात सुचवल्याप्रमाणे, त्यासाठी सीटीएला अधिकृत मान्यता देण्याचीही गरज नाही, किंवा संवाद साधण्यासाठी वेगळ्या समन्वयकाचीही गरज नाही, कारण ही यंत्रणा आधीपासूनच अस्तित्वात आहे.[८६] भविष्यातही, भारताने तिबेटी समुदायाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि अध्यात्मिक कार्यक्रमांना पाठिंबा देणे सुरू ठेवावे.

निर्वासित तिबेटी समुदायामध्ये काही गट आहेत, ज्यांना “विरोधा”चे धोरण बदलण्याची इच्छा आहे. दलाई लामांनी तिबेट-चीन मुद्द्यावर शांततापूर्ण तोडगा निघावा असे आवाहन केलेले आहे. पण ते गेल्यावर, त्यांचे मार्गदर्शन नसताना या गटांना कसे हाताळायचे, या प्रश्नावरही भारताने पुरेसा विचार करणे आवश्यक आहे. एका अभ्यासाने असे सुचवलेले आहे, की पीआरसी शुग्डेन पंथातल्या (ज्याच्याबरोबर १४व्या दलाई लामांचे गंभीर मतभेद आहेत) १५ वा दलाई लामांची निवड करू शकते.[८७] तसे झाले, तर निर्वासित तिबेटी समुदायात हिंसाचार होऊ शकतो आणि भारतात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. संविधानाने दिलेला हक्क आणि कायद्यानेही, जोपर्यंत निर्वासित समुदाय भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला धोका पोचेल अशी (अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्थाही त्यात समाविष्ट आहे) कोणतीही कृती करत नाही, तोपर्यंत त्या समुदायाला त्याच्या संस्था भारताच्या भूमीतून चालवून देण्याला हरकत घ्यायचे काहीही कारण नाही. पण या तिबेटी समुदायात हिंसाचार झाला, किंवा भारताच्या भूमीतून पीआरसीविरुद्ध हिंसाचाराला चिथावणी देण्यात आली, तर ते मात्र खपवून घेतले जाणार नाही. त्याचप्रमाणे, भारतातल्या तिबेटी समुदायाच्या व्यवहारांमध्ये पीआरसी किंवा युनायटेड वर्क फ्रंटसारखे तिचे प्रतिनिधी यांचीही ढवळाढवळ खपवून घेतली जाणार नाही.  असे कोणतेही प्रयत्न चीनकडून झाले, तर भारतीय कायद्यांनुसार त्यावर कारवाई करावी. भारतीय कायद्यातली कोणकोणती कलमे अशा स्थितीत लागू पडतील, याचा तपास आधीच करून ठेवावा.

सहावा पर्याय म्हणजे, भारताने किंमत-फायदा यांची व्यवस्थित समीकरणे मांडून, १४व्या दलाई लामांनंतर कोणकोणत्या समविचारी देशांबरोबर संवाद साधता येईल याचा विचार करून ठेवावा.[८८] अमेरिकेच्या कॉंग्रेसने पीआरसीच्या कथनाला आणि दाव्यांना प्रत्युत्तर देण्याकरता विविध पातळ्यांवर प्रशासनाला तयारी करण्याचे आदेश या आधीच दिलेले आहेत. अवताराच्या प्रश्नाबाबत जागतिक युती करून एकत्रित पुढाकार घ्यायचा का, हे भारताला ठरवावे लागेल, कारण त्याचे भारत देशावर थेट परिणाम होतील. आंतरराष्ट्रीय मतप्रवाहाचे पडसाद देशात नक्कीच उमटतील आणि त्यांचा आदरही करावा लागेल. पण या अस्थिर स्थितीचा गैरफायदा उठवून बाकीच्या देशांना अशी कोणतीही कृत्य करण्यासाठी परवानगी देऊ नये, ज्याने भारत आणि पीआरसीमधला तणाव वाढेल.

सातवा पर्याय म्हणजे, १४व्या दलाई लामांनी असे सांगितले आहे, की जर त्यांनी पुनर्जन्म घेतला, तर तो “स्वतंत्र” देशात असेल. २०११ मध्ये ते स्पष्टपणे हेही म्हणाले होते, की “पीआरसी किंवा कोणीही केवळ राजकीय हेतूंसाठी निवडलेल्या उमेदवाराला स्वीकारले जाणार नाही.” यातून आणखी काही खालील प्रश्न निर्माण होतात, ज्यांच्यासाठीही योग्य धोरण आखणी करणे आवश्यक आहे.

a. जर १५वे दलाई लामा होणारा उमेदवार तिसऱ्या देशात सापडला, तर काय होईल? भारताने अधिकृत अथवा अनधिकृतपणे त्याला वैध दलाई लामा म्हणून स्वीकारू नये, अशी मागणी जर पीआरसीने स्पष्टपणे केली, तर भारत कशी प्रतिक्रिया देईल?

b. जर परदेशात सापडलेल्या उमेदवारासंबंधी भारत सरकारने कोणतीही उघड भूमिका घेतली नाही, तरी भारत त्याला देशात येण्याची परवानगी देईल का? त्यासाठी चीनने हरकत घेतली, तर भारत तिला कसे उत्तर देईल?

c. जर १५वे दलाई लामा भारतात सापडले, तर भारत हे जाहीरपणे कबूल करेल का? नाही केले, तर त्या बुद्धावताराचे स्थान काय असेल?

d. अनेक निर्वासित आता भारताचे नागरिक झाले आहेत. जर दलाई लामा होणारा उमेदवार भारतीय नागरिक असेल, तर भारत या स्थितीचा सामना कसा करेल?

e. दुसरी किंवा तिसरी स्थिती उद्भवली, तर १५व्या दलाई लामांकडे भारत १४व्या दलाई लामांचे निवासस्थान आणि पूजा सामग्रीचा ताबा देईल का? भारत त्यांची पदावर प्रतिष्ठापनाही करेल का?

f. दलाई लामांकडे असलेले पूजा साहित्य आणि इतर सांकेतिक चिन्ह चीनच्या मालकीची आहेत आणि ती त्याला परत केली पाहिजेत, या पीआरसीच्या मागणीला भारत काय उत्तर देणार आहे? याच्या राजकीय परिणामांबरोबरच कायदेशीर परिणामही होऊ शकतील.

g. पुढचा बुद्धावतार असलेला लहान मुलगा, ज्याची १५वे दलाई लामा म्हणून निवड झालेली आहे, तो प्रौढ वयाच्या होईपर्यंत एका रिजन्सी काउन्सिलच्या देखरेखीखाली असेल. भारताचे या काउन्सिलशी कसे संबंध असतील? त्याला भारतातून काम करायचे असल्यास, कोणत्या मार्गदर्शक सूचना दिल्या जातील?

या प्रश्नांचे परिणाम परदेश धोरण आणि देशांतर्गत बाबींवरही होणार असल्यामुळे, त्यातून स्थान अथवा निवास हे मुद्दे वेगळे काढून केवळ मान्यतेच्या मुद्यावर ते हाताळले गेले पाहिजेत. संविधानिक पातळीवरून पाहिले, तर धार्मिक संघटनांना राज्याच्या हस्तक्षेपाविना त्यांचे नेतृत्व, निवास आणि प्रथा ठरवण्याचा हक्क आहे. नवीन उमेदवाराला नाकारण्याचा दबाव पीआरसी भारतावर टाकू शकेल. पण, भारत सरकारने उमेदवाराबाबत कोणतेही मतप्रदर्शन करणे आवश्यक नाही, कारण देशाचे कायदे आणि संविधान हे दोन्ही त्या-त्या संबंधित समुदायांना स्वतःचे अध्यात्मिक गुरू निवडण्याचे स्वातंत्र्य देतात. त्या उमेदवाराला भारतात राहण्याची परवानगी देणे हेही भारताच्या संस्कृतीशी आणि इतिहासाशी सुसंगत आहे. मात्र, १५वे दलाई लामा होणाऱ्या उमेदवाराला सद्य दलाई लामांच्या पूजा साहित्य आणि इतर चिन्ह हाताळण्याची परवानगी देण्यात यावी, या तिबेटी समुदायाच्या मागणीकडे थोडे सावधपणे बघावे लागेल. या साहित्यावर आणि चिन्हांवर पीआरसी हक्क सांगू शकते. ते चीनच्या बाहेर बेकायदेशीरपणे नेण्यात आले होते आणि ते परत केले पाहिजेत, अशी मागणी पीआरसी करू शकते.

# तात्पर्य

दलाई लामा आणि त्यांचा पुढचा अवतार याबद्दलच्या चीनच्या धोरणात भारताचा मुद्दा केंद्रस्थानी नाहीये. तिबेटमध्ये स्थैर्य आणि राजकीय नियंत्रण राखणे या मुद्द्यांभोवती प्राधान्याने चीनचे धोरण आखले जाते. शिवाय, दोन दलाई लामांच्या हस्तांतरणाच्या काळात अमेरिका तिबेटला अस्थिर करायचा प्रयत्न करेल आणि चीनची आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनामी करेल, या भीतीचाही चीनला सामना करून त्याप्रमाणे स्वतःचे धोरण आखावे लागते. भारताच्या भूमीत निर्वासित आहेत आणि भारतातही अनुयायी असल्यामुळे पुनर्जन्माच्या प्रश्नात भारतही गुंतलेला आहे. तो फक्त कडेला थांबून या सगळ्याकडे पाहू शकत नाही.

तिबेट सोडून सहा दशके झाली, तरी तिबेटी जनतेच्या मनात आणि हृदयात दलाई लामांचा मोठा प्रभाव आहे. याची चिंता अर्थातच बीजिंगला वाटते. वॉशिंग्टननेही तिबेट आणि दलाई लामांना आपला पाठिंबा दर्शवला आहे. त्यामुळे, गेल्या पंधरा वर्षांत पीआरसीने १४वे दलाई लामा आणि पुनर्जन्माच्या प्रश्नावर कठोर धोरणाचा अवलंब केला आहे. या कठोर धोरणामुळे भारताच्या धोरण आखणीत नवे प्रश्न निर्माण होत आहेत. १५व्या दलाई लामांचा अवतार आणि त्याची मान्यता, १४व्या दलाई लामांच्या निधनानंतर त्यांचा वारस निवडेपर्यंत मधल्या काळातली अनिश्चितता हे प्रश्न भारतासाठीही गुंतागुंतीचे आहेत.

गेली पासष्ठ वर्ष, भारत आणि चीनदरम्यान एक अस्वस्थ शांतता आहे, कारण दोन्ही देशांमध्ये १४व्या दलाई लामांबद्दल संदिग्धता नाहीये. पण त्यांचे निधन झाल्यानंतर जर पुढचा बुद्धावतार पीआरसीच्या बाहेरचा असेल, तर ते चीन मान्य करणार नाही. दलाई लामांचे मुख्य निवासस्थान, तात्पुरते धार्मिक स्थान आणि चिन्हे भारतात असल्यामुळे, पुनर्जन्माचा मुद्दा आणि चीनबाहेरच्या उमेदवाराबद्दल भारताचे मत यात पीआरसीला प्रचंड स्वारस्य आहे. भारताच्या धोरणाचा इथे कस लागणार आहे. पीआरसीला तिबेटमध्ये स्थैर्य राखायचे आहे आणि त्याचवेळी तिबेटला अस्थिर करायच्या अमेरिकेच्या प्रयत्नांना थांबवायचे आहे. भारताचे धोरण पीआरसीला मदत तरी करेल,

किंवा तिच्या विरोधात तरी जाईल. म्हणून ते संवेदनशील आहे. या पेचामुळे, धोरण आखताना भारताला पीआरसीशी असलेले संबंध, इथे रहात असलेला आणि परदेशातला तिबेटी समुदाय, चीन-अमेरिका संबंध आणि भारत-अमेरिका संबंध हे सगळे घटक लक्षात घ्यावे लागणार आहेत.

शेवटी, दलाई लामा होणाऱ्या उमेदवाराला धर्मशाळा इथून त्याची कर्तव्ये करू द्यावीत याकरता भारतावर आंतरराष्ट्रीय आणि अंतर्गत दबाव वाढू शकेल. त्यामुळे काहीही न करणे हेही भारताला परवडणार नाही. १४व्या दलाई लामांच्या निधनानंतर दोन्ही देशांमधले संबंध सुधारण्यासाठी आणि त्याद्वारे पीआरसीची मर्जी संपादन करण्यासाठी स्वतःहून कोणतीही कृती करणे हेही योग्य ठरणार नाही. कारण, पीआरसीकडूनही प्रतिक्रिया म्हणून चांगली वर्तणूक दिली जाईल, याची शक्यता धूसर आहे. या लेखाच्या शेवटी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर विचार केला, तर हेतूंमध्ये स्पष्टता येईल, अवघड परिस्थिती हाताळण्यासाठी मदत होईल आणि भारताला त्याचे मूळ हेतू साध्य करण्याची संधी मिळेल.

# लेखाविषयी

**विजय गोखले** हे कार्नेगी इंडियाचे नॉन रेसिडेंट सिनियरफेलो आहेत. एकोणचाळीस वर्षांच्या मुत्सद्देगिरीच्या कारकीर्दीनंतरजानेवारी, 2020 मध्येते भारतीय परराष्टट्रसेवेतून निवृत्त झाले. 2018-2020 याकाळात ते भारताचे परराष्टट्रसचिव म्हणून कार्यरत होते.

याजबाबदारीआधी, जानेवारी 2010 ते ऑक्टोबर2013 याकाळात ते भारताचे मलेशियामधले हाय कमिशनरहोते, ऑक्टोबर2013 ते जानेवारी 2016 याकाळात ते जर्मनीतले राजदूत होते आणि जानेवारी 2016 ते ऑक्टोबर2017 याकाळात ते पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनामधले भारताचे राजदूत होते. जुलै 2003 ते जानेवारी 2007 याकाळात ते तैवानमध्येभारत-तैपेइ असोसिएशनचे प्रमुख होते. परराष्टट्रखात्याच्या मुख्यालयात काम करत असतानात्यांनी पूर्वआशियाविभागात महत्त्वाच्या पदांवरकाम केले. मार्च2007 ते डिसेंबर2009 याकाळात त्यांनी सह-सचिव (डायरेक्टरजनरल), पूर्वआशियायापदावरकाम केले. इन्डो-पॅसिफिक प्रदेशाशी निगडित असलेल्या विषयांवर, त्यातही विशेषकरून चिनी राजकारणआणि मुत्सद्देगिरी यावरत्यांनी विस्तृत काम केलेले आहे. परराष्टट्रसेवेतून निवृत्तीस्वीकारल्यानंतरन्यूयॉर्कटाइम्स, फॉरेन पॉलिसी, द हिंदू, द टाइम्स ऑफ इंडियाआणि इंडियन एक्स्प्रेससारख्या वृत्तपत्रांमधून त्यांनी स्तंभ लिहून आपल्या मतांची मांडणी केलेली आहे. तिआनमेन स्क्वेअर: द मेकिंग ऑफ अ प्रोटेस्ट(हार्परकॉलिन्स इंडिया, मे 2021), द लॉन्गगेम : हाऊ द चायनीज नेगोशिएट विथइंडिया(पेंग्विन रॅन्डम हाऊस इंडिया, जुलै 2021) आणि आफ्टरतिआनमेन : द राइज ऑफ चायना(हार्परकॉलिन्स इंडिया, सप्टटेंबर, 2022) ही तीन पुस्तकेही त्यांनी लिहिलेली आहेत.

## अस्वीकरण

या लेखात मांडलेली मते लेखकाची आहेत आअणि कोणतीही अधिकृत किंवा इतर संस्थेचे त्यातून प्रतिनिधित्व होते, असे समजले जाऊ नये. हा लेख प्रकाशित करून वाचकाला काही माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या विषयावरचे हे अंतिम मत आहे किंवा हा विषय पूर्णपणे इथे मांडलेला आहे असा कोणताही दावा याद्वारे केलेला नाही.

# टिपा


1. "Central Tibetan Administration – Restoring Freedom for Tibetans," Central Tibetan Administration, December 22, 2019, https://tibet.net, accessed on June 2, 2024.
2. Rohit Mullick, "Would Prefer to Die in Free Democracy like India: Dalai Lama," *Times of India*, September 23, 2022, https://timesofindia.indiatimes.com/city/shimla/would-prefer-to-die-in-free-democracy-like-india-dalai/articleshow/94386853.cms.
3. "Tibet Since 1951: Liberation, Development and Prosperity," The State Council Information Office of the People's Republic of China, May 2021, https://english.www.gov.cn/atts/stream/files/60a7228bc6d0cc300eea77c2.
4. पीआरसीच्या म्हणण्यानुसार, दलाई लामांच्या अवताराची निवड करण्यासाठी, प्रत्येक उमेदवाराचे नाव आणि जन्मतारीख धातूच्या किंवा हस्तिदंताच्या पट्टीवर लिहून त्या एका सुवर्ण कलशात ठेवल्या जातात आणि एक पट्टी त्यातून काढली जाते. १७९३च्या शाही अध्यादेशानुसार, चिनी राजाचे प्रतिनिधी परंपरेनुसार या प्रक्रियेवर देखरेख ठेवतात; The Dalai Lama's Statement on Reincarnation from Dharamsala, September 24, 2011, https://www.dalailama.com/news/2011/statement-of-his-holiness-the-fourteenth-dalai-lama-tenzin-gyatso-on-the-issue-of-his-reincarnation.
5. O. P. Tandon and Rebon Catharina Banarjee Dhar, *Resetting India's Tibet Policy 2022: Repositioning the Future* (Foundation for Non-Violent Alternatives, 2022), 76.
6. Ibid., 77.
7. Mao Zedong told Edgar Snow in July 1936 that "when the people's revolution has been victorious in China the Outer Mongolian republic will automatically become part of the Chinese federation at its own will. The Mohammedan and Tibetan peoples, likewise, will form autonomous republics attached to the China federation;" Edgar Snow, "Interviews with Mao Tse-tung, July – September 1936," *China: The March Towards Unity* (Workers Library Publishers, 1937), 33–50.
8. "Although they [ethnic minorities] constitute only six percent of the population, they inhabit extensive regions which comprise 50 to 60 percent of China's total area," in "On the Correct Handling of Contradictions Among the People," *Selected Works of Mao Tse-tung*, February 27, 1957, https://www.marxists.org/reference/archive/mao/selected-works/volume-5/mswv5_58.htm; "On the Ten Major Relationships," *Selected Works of Mao Tse-tung*, April 25, 1956, https://www.marxists.org/reference/archive/mao/selected-works/volume-5/mswv5_51.htm.

9. “On Coalition Government,” *Selected Works of Mao Tse-tung*, April 24, 1945, https://www.marxists.org/reference/archive/mao/selected-works/volume-5/mswv5_51.htm.

10. “From the Diary of N. V. Roshchin, Memorandum of Conversation with Premier Zhou Enlai on 15 November 1949,” History & Public Policy Program Digital Archive, December 1, 1949, https://digitalarchive.wilsoncenter.org/document/117887.

11. Pan Jiaguo, *Contemporary China History Studies, Vol. I* (2008), 97–105.

12. “Agreement on Measures for the Peaceful Liberation of Tibet (*17-point Agreement of May 1951*),” claudearpi.net, accessed October 2, 2024, https://www.archieve.claudearpi.net/maintenance/uploaded_pics/1951AgreementonMeasuresforthePeacefulLiberationofTibet.pdf.

13. “On the Policies for Our Work in Tibet – Directive of the Central Committee on the Communist Party of China,” *Selected Works of Mao Tse-tung*, April 6, 1952, https://www.marxists.org/reference/archive/mao/selected-works/volume-5/mswv5_51.htm.

14. Lodi Gyaltsen Gyari, *The Dalai Lama's Special Envoy: Memoirs of a Lifetime in Pursuit of a Reunited Tibet* (HarperCollins, 2023), 75.

15. “He appears to me as a father and he himself considered me as a son. [We had] very good relations,” said the Dalai Lama in a 2012 BBC interview on The Andrew Marr Show; “Mao was like a Father to Me, says the Dalai Lama,” *The Hindu,* June 29, 2012.

16. The People's Republic of China: Document 19: The Basic Viewpoint on the Religious Question During our Country's Socialist Period [SELECTIONS], Central Committee of the Chinese Communist Party, March 31, 1982. Translation from Donald E. MacInnis, *Religion in China Today: Policy and Practice* (Orbis Books, 1989), 8-26, https://original.religlaw.org/content/religlaw/documents/doc19relig1982.htm.

17. Ibid.

18. “The Basic Viewpoint on the Religious Question during Our Country's Socialist Period,” translation reprinted in www.original.religlaw.org with permission from Religion in China Today: Policy & Practice, 8-26 by Donald E McInnis, (Christopher Brooks, copyright 1989).

19. Constitution of the People's Republic of China, article 36, chapter II (amended March 14, 2004).

20. Lodi Gyaltsen Gyari, *The Dalai Lama's Special Envoy*, 238–243.

21. तिआनमेन स्क्वेअर घटनेचा निषेध सुरू असताना १९८९ मध्ये तिबेटमध्ये मार्शल लॉ घोषित करण्यात आला होता. धर्माचे नाव पुढे करून भिक्कू बंडाच्या तयारीत गुंतलेले आहेत, असे कारण त्यासाठी देण्यात आले होते. .

22. “Government Policy Toward Religion in the People's Republic of China—A Brief History,” Pew Research Center, August 30, 2023, https://www.pewresearch.org/religious-landscape-study/2023/08/30/government-policy-toward-religion-in-the-peoples-republic-of-china-a-brief-history/.

23. Pitman B. Potter, “Belief in Control: Regulation of Religion in China,” *The China Quarterly*, no 174, (June 2003): 317–37, http://www.jstor.org/stable/20058996.

24. Lodi Gyaltsen Gyari, *The Dalai Lama's Special Envoy*, 354-356.

25. “Government Policy Towards Religion in People's Republic of China—A Brief History,” in *Measuring Religion in China*, (Pew Research Center, August 30, 2023).

26. Regulations on Religious Affairs, Decree of the State Council of the People's Republic of China No. 426, (Effective March 1, 2005), http://www.cppcc.gov.cn/ccrp/2012/05/09/ARTI1336554114696658.shtml.

27. Ibid.

28. Management Measures for the Reincarnation of Living Buddhas in Tibetan Buddhism, State Religious Affairs Bureau Order, Order No. Five, (Issued on July 18, 2007) https://www.cecc.gov/resources/legal-provisions/measures-on-the-management-of-the-reincarnation-of-living-buddhas-in-0.

29. Ibid.

30. Lodi Gyaltsen Gyari, *The Dalai Lama's Special Envoy*, 577-578.

31. दलाई लामा तिबेटी बौद्ध धर्माच्या गेलुग्पा पंथाचे आहेत. गेलुग्पा पंथापेक्षा पंचेन लामा दुय्यम पंथ आहे, असे सहसा समजले जाते. १९८९ मध्ये १०व्या पंचेन लामांचे निधन झाल्यावर पीआरसीने ग्याएनसेन नोर्बु या स्वत:च्या उमेदवाराची ११वे पंचेन लामा म्हणून नियुक्ती केली. खरे तर दलाई लामांनी गेधुन चोएक्यी न्यिमा या वेगळ्या उमेदवाराची निवड केलेली होती. या उमेदवाराला पीआरसीने अटक करून ताब्यात घेतले आहे, असे समजले जाते. त्याचा ठावठिकाणा अज्ञात आहे. १९९५ मध्ये दलाई लामांनी मान्य केलेला उमेदवार बीजिंगने अमान्य केला आणि त्यांनी निवडलेल्या ग्याएनसेन नोर्बु यांचाच अभिषेक केला.

32. "Communique on the Current State of the Ideological Sphere," translated by China File, April 2013, https://www.chinafile.com/document-9-chinafile-translation.

33. Xinhua, "Xi Calls for Improved Religious Work," *China,org.cn,* April 24, 2016, http://www.china.org.cn/china/2016-04/24/content_38312410.htm#,

34. *Xi Jinping: The Governance of China Vol. II* (Foreign Language Press, 2017), 329.

35. Naoko Eto, "Why Does the Xi Jinping Administration Advocate the "Sinicization" of Religion?" *SPF China Observer*, no 8, (August 11, 2018), https://www.spf.org/spf-china-observer/en/document-detail008.html.

36. "The State of Religion in China," Council of Foreign Relations, last updated May 15, 2024, accessed May 24, 2024.

37. *China 2022 International Religious Freedom Report*, Office of International Religious Freedom, U.S. Department of State, https://www.state.gov/wp-content/uploads/2023/05/441219-CHINA-2022-INTERNATIONAL-RELIGIOUS-FREEDOM-REPORT.pdf.

38. O.P. Tandon and Rebon Catharina Banarjee Dhar, *Resetting India's Tibet Policy 2022,* 45–46.

39. O.P. Tandon and Rebon Catharina Banarjee Dhar, *Resetting India's Tibet Policy 2022,* 48.

40. Robert Barnett, "The Post Dalai Era: The Party Prepares for the Tibetan Leader's Death," in "*The Dalai Lama Succession: Strategic Realities of the Tibet Question*," ed. Jagannath Panda and Eerishka Pankaj (Institute for Security & Development Policy, Organization for Research on China and Asia (ORCA), 2023), https://isdp.eu/wp-content/uploads/2023/05/ISDP-Special-Paper-Tibet-May-15.pdf.

41. *China's Policies and Practices on Protecting Freedom of Religious Belief*, white paper, (The State Council Information Office of the People's Republic of China, April 2018), http://english.scio.gov.cn/node_8004074.html.

42. Sarah Cook, "The Battle for China's Spirit: Religious Revival, Repression, and Resistance under Xi Jinping," Freedom House, 2017, accessed August 5, 2024, https://freedomhouse.org/report/special-report/2017/battle-chinas-spirit.

43. H. E. Richardson, "History Down to the Close of the XIXth Century," in *Tibetan Precis*, (1912), www.claudearpi.net/wp-content/uploads/2016/11/1945-Tibetan-Precis-by-Richardson.pdf.

44. *Tibet since 1951: Liberation, Development and Prosperity*, (The State Council Information Office of the People's Republic of China, May 2021), https://english.www.gov.cn/atts/stream/files/60a7228bc6d0cc300eea77c2.

45. Melvyn C. Goldstein, "The United States, Tibet, and the Cold War," *Journal of Cold War Studies* 8, no. 3 (2004): 145–64, https://www.jstor.org/stable/26925945.

46. डिसेंबर, १९४६ मध्ये नवी दिल्ली इथे स्थित असलेल्या अमेरिकेच्या राजदूताला अमेरिकेच्या सेक्रेटरी ऑफ स्टेटकडून एक निरोप आला. त्याने तिबेटला, "अनौपचारिकपणे आणि व्यक्तीगत पातळीवरून सांगायचे होते, की चीनच्या नियंत्रणातून आता तिबेट आता स्वतंत्र आहे असे दिसतेय, आणि आत्ता या वेळेला चीनपासून संपूर्ण फारकत घेण्याचे कोणते वास्तविक अथवा वैचारिक प्रयत्न केले, तर चीनचे कम्युनिस्ट घाईघाईत आणखी पावले उचलतील आणि सध्याची जी स्थिती आहे, ती बिघडेल." Doc. 1056, Telegram from the Secretary of State to Ambassador in India (Henderson), in *Foreign Relations of the United States, 1949, The Far East: China, Volume IX* (United States Government Printing Office, December 21, 1949), https://history.state.gov/historicaldocuments/frus1949v09/d1056.

47. Message from State Department to Dalai Lama, 7 September 1951, 793B.00/9–1851, RG 59, NARA: quoted in Goldstein, *History of Modern Tibet*, 808–810, cited in Melvyn C. Goldstein, "The United States, Tibet, and the Cold War."

48. "Doc. 399, Telegram from Department of State to Embassy in India, November 25, 1959," in *Foreign Relations of the United States, 1958–1960, China, Volume XIX* (United States Government Printing Office, Washington, 1996); https://history.state.gov/historicaldocuments/frus1958-60v19/d399. "Doc. 401" and "Editorial Note," ibid.

49. चीन आणि अमेरिकेने परस्पर राजनैतिक संबंध प्रस्थापित केल्यानंतरच १९७१ मध्ये त्यांची पहिली भेट होऊ शकली. “Memorandum from Presidential Assistant for National Security Affairs (Kissinger) to President Nixon, January 26, 1970,” in *Foreign Relations of the United States, 1969–1976, Volume XVII* (United States Government Printing Office, Washington, 2006), https://history.state.gov/historicaldocuments/frus1969-76v17/d64.

50. President George H.W. Bush had met with him “privately” in April 1991. Lodi Gyaltsen Gyari, *The Dalai Lama's Special Envoy,* 352.

51. “President Clinton and President Jiang Zemin Joint Press Conference, 1997,” USC US-China Institute, USC Annenberg, October 29, 1997, https://china.usc.edu/president-clinton-and-president-jiang-zemin-joint-press-conference-1997.

52. Weekly Compilation of Presidential Documents, Monday July 6, 1998, Volume 34–Number 7, 1243-1309, https://www.govinfo.gov/app/collection/cpd/1998/07.

53. Informal contact was re-established at Hongkong in December 1997. Lodi Gyaltsen Gyari, *The Dalai Lama's Special Envoy,* 353.

54. Susan V. Lawrence, “The Tibetan Policy Act of 2002: Background and Implementation,” Congressional Research Service, Updated July 9, 2015, https://crsreports.congress.gov/product/pdf/R/R43781.

55. Lodi Gyaltsen Gyari, *The Dalai Lama's Special Envoy*, 327.

56. H.R.4331 - Tibetan Policy and Support Act of 2019, Passed House on January 28, 2020, https://www.congress.gov/bill/116th-congress/house-bill/4331; Such Chinese officials will be subject to sanctions under the Global Magnitsky Act, including the denial of entry into the United States.

57. H.R.4331 - Tibetan Policy and Support Act of 2019.

58. S.138 - Promoting a Resolution to the Tibet-China Dispute Act, Public Law No. 118-70, July 12, 2024, https://www.congress.gov/bill/118th-congress/senate-bill/138.

59. Ministry of Foreign Affairs of the People's Republic of China, “Foreign Ministry Spokesperson Qin Gang's Regular Press Conference on March 7, 2014,” March 8, 2013, http://www.fmprc.gov.cn/mfa_eng/xwfw_665399/ cited in Susan V. Lawrence,” The Tibetan Policy Act of 2002: Background and Implementation.”

60. “Foreign Ministry spokesperson Hua Chunying's remarks on the US House of Representatives Passing the Tibetan Policy and Support Act 2019,” Ministry of Foreign Affairs of the PRC, January 29, 2020, https://www.mfa.gov.cn/eng/xw/fyrbt/fyrbt/202405/t20240530_11349636.html.

61. “Foreign Ministry Spokesperson's Remarks on the US Signing into Law the “Promoting a Resolution to the Tibet-China Dispute Act,” Ministry of Foreign Affairs, July 13, 2024. https://www.mfa.gov.cn/eng/xw/fyrbt/fyrbt/202407/t20240730_11463279.html

62. The Regulations on Religious Affairs, Decree of the State Council of the People's Republic of China, No. 426, (Effective March 1, 2005), http://www.cppcc.gov.cn/ccrp/2012/05/09/ARTI1336554114696658.shtml.

63. Measures on the Management of the Reincarnation of Living Buddhas of Tibetan Buddhism, State Religious Affairs Bureau Order No. 5 (Issued July 18, 2007), https://www.cecc.gov/resources/legal-provisions/measures-on-the-management-of-the-reincarnation-of-living-buddhas-in-0.

64. *Xinhua,* “Xi Calls for Improved Religious Work,” China.org.cn, April 24, 2016, http://www.china.org.cn/china/2016-04/24/content_38312410.htm.

65. Naoko Eto, “Why does Xi Jinping Administration Advocate the ‘Sinicization’ of Religion?”

66. *China's Policies and Practices on Protecting Freedom of Religious Belief.*

67. Measures for the Administration of Internet Religious Information Services, Order No. 17 of the National Religious Affairs Administration, the Cyberspace Administration of China, the Ministry of Industry and Information Technology, the Ministry of Public Security, and the Ministry of State Security, (Effective January 3, 2022), http://www.lawinfochina.com/display.aspx?id=39108&lib=law.

68. Sarah Cook, "The Battle for China's Spirit: Religious Revival, Repression and Resistance under Xi Jinping.

69. "CPC Policies on the Governance of Xizang in the New Era: Approach and Achievements" white paper, (The State Council Information Office of the People's Republic of China, November 2023, http://english.scio.gov.cn/node_9004977.html.

70. H. E. Richardson, "History Down to the Close of the XIXth Century," Section 31; Ibid, 39.

71. "Note by Prime Minister on the Policy Towards Tibet, July 9, 1949," in *India-China Relations 1947-2000 A Documentary Study Vol II*, ed. A. S. Bhasin (Geetika Publishers, 2018) 121–122. http://www.geetikapublishers.com/PDF/India-China-Relations-Contents.pdf.

72. ऑगस्ट, १९५० मध्य पीआरसीला दिलेल्या स्मरणपत्रातून भारताने आग्रहाने, "भारत आणि तिबेट यांदरम्यान निश्चित झालेली सीमा बदलता कामा नये" याची खात्री करून घेण्याचे कळवले. "Doc. 0206, Telegram from Foreign New Delhi to Indembassy Peking, August 24, 1950," in *India-China Relations 1947-2000 A Documentary Study Vol II*, ed A.S. Bhasin, 329.

73. "Doc. 0230, Notes exchanged between Delhi and Peking in 1950," in ibid., 374–375; Ranjit Singh Kalha, *India-China Boundary Issues: Quest for Settlement* (ICWA/Pentagon Press, 2014) 97, http://www.pentagonpress.in/book_details.aspx?this=385.

74. "Doc. 0300, Telegram from Indembassy Peking to Foreign New Delhi, March 22, 1951," in *India-China Relations 1947-2000 A Documentary Study Vol II*, ed A.S. Bhasin, 507.

75. "Doc. 0981, Talks between Prime Minister Jawaharlal Nehru and Chinese Premier Zhou Enlai," in ibid., 1780–1781.

76. "The Indian side reiterated the long standing and consistent policy of the Government of India that Tibet is an autonomous region of China and that anti-China political activities by Tibetan elements are not permitted on Indian soil.' "India-China Joint Press Communique," *Indian Journal of Asian Affairs* 2, no. 1 (1989): 53-55, http://www.jstor.org/stable/41950350.

77. "The Indian side recognizes that the Tibet Autonomous Region is part of the territory of the People's Republic of China and reiterates that it does not allow Tibetans to engage in anti-China political activities in India." Declaration on Principles for Relations and Comprehensive Cooperation between the Republic of India and the People's Republic of China, June 24, 2003, https://archive.pib.gov.in/archive/releases98/lyr2003/rjun2003/24062003/r2406200318.html.

78. "Tibet Since 1951: Liberation, Development and Prosperity," State Council Information Office of the People's Republic of China, May 2021.

79. "Official Spokesperson's response to a query regarding a recent media report on the Government's position on His Holiness the Dalai Lama," Ministry of External Affairs, Government of India, March 2, 2018, https://www.mea.gov.in/media-briefings.htm?dtl/29532/Official_Spokespersons_response_to_a_query_regarding_a_recent_media_report_on_the_Governments_position_on_His_Holiness_the_Dalai_Lama.

80. "India-China relations are at a major low. China has repeatedly intruded into and occupied Indian territory. Both armies are eyeball-to-eyeball in the higher Himalayas. India has stopped referring to the 'One China' policy for years. And since China does not see India as an equal and treats the border dispute as a convenient political tool, New Delhi should have no hesitation in backing the Tibetan cause. India needs leverage. And the Tibet issue is a big one." "The Tibet Play," *Times of India*, June 21, 2024, https://timesofindia.indiatimes.com/blogs/toi-editorials/the-tibet-play-2/

81. Jagannath Panda and Eerishika Pankaj, "The Dalai Lama's Succession: Strategic Realities of the Tibet Question," Institute for Security & Development Policy, Organisation for Research on China and Asia (ORCA), May 2023, https://www.isdp.eu/publication/the-dalai-lamas-succession-strategic-realities-of-the-tibet-question/.

82. पुढच्या अवताराचा शोध घेण्याचे कार्य १४व्या दलाई लामांनी धर्मशाळा, भारत इथे स्थापन झालेला गाडेन फोडरँग या ट्रस्टकडे सोपवले आहे. "Resolutions of the Third Special General Meeting on Reincarnation," Central Tibetan Administration, October 9, 2019, https://tibet.net/resolutions-of-the-third-special-general-meeting-on-reincarnation/.

83. O.P. Tandon and Rebon Catharina Banarjee Dhar, *Resetting India's Tibet Policy 2022*, 81.

84. "Remarks by External Affairs Minister Dr. S. Jaishankar at the launch of Asia Society Policy Institute," August 29, 2022, Ministry of External Affairs, Government of India, https://www.mea.gov.in/Speeches-Statements.htm?dtl/35662/.

85. ५वे ते १३वे दलाई लामा यांचे अवशेष पोटाला कॉम्प्लेक्सच्या पोतरांग मार्पो किंवा लाल महालात पुरलेले आहेत. (अपवाद, ६व्या दलाई लामांचा. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे अवशेष सापडू शकले नाहीत.) तिबेटी आणि बौद्धधर्मीयांसाठी ही एक पूज्य जागा आहे.

86. O.P. Tandon and Rebon Catharina Banarjee Dhar, *Resetting India's Tibet Policy 2022,* 86.

87. O.P. Tandon and Rebon Catharina Banarjee Dhar, *Resetting India's Tibet Policy 2022*, 76.

88. Jagannath Panda and Eerishika Pankaj, "'The Dalai Lama's Succession: Strategic Realities of the Tibet Question."

# Carnegie India

Carnegie India, founded in 2016 and based in New Delhi, is part of a robust global network that includes over 170 scholars. The center focuses primarily on three interrelated topics: technology and society, political economy, and security studies. Led by Indian experts with decades of policy experience, Carnegie India engages with governments, policymakers, academics, students, industries, practitioners, and civil society to provide insightful and fresh analysis on India's pressing challenges and its rising global role.

## Carnegie Endowment for International Peace

In a complex, changing, and increasingly contested world, the Carnegie Endowment generates strategic ideas, supports diplomacy, and trains the next generation of international scholar-practitioners to help countries and institutions take on the most difficult global problems and advance peace. With a global network of more than 170 scholars across twenty countries, Carnegie is renowned for its independent analysis of major global problems and understanding of regional contexts.

CARNEGIE
INDIA

CarnegieIndia.org